बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३३ | बुधवार,दि. २६ जुलै २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

"गेमिंग ॲप'द्वारे ८०० कोटींच्या वर फसवणूक; ठगबाज अनंत जैनच्या घरात सापडले २६ कोटींचे घबाड

■ नागपूरमध्ये एका व्यावसायिकाची फसवणूक, आरोपीच्या ठिकाणावर छापे

■ तपासादरम्यान आरोपीच्या घरी आढळली १०० कोटीची मालमत्ता

गोंदिया/नागपूर : ऑनलाइन गेमच्या नावावर सट्टा लावून जास्त नफ्याचे आमिष दाखवून शहरातील एका व्यावसायिकाची ५८ कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरुन गोंदियातील आरोपी अनंत नवरतन जैन याच्या ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. बनावट ऑनलाईन "गेमिंग एप' तयार करून देशभरातील हजारो गुंतवणुकदारांना कोट्यवधीचा गंडा घालणा?या गोंदियातील अनंत जैनने केलेल्या फसवणूकीचा आकडा जवळपास ८०० कोटींच्या वर जाण्याची शक्यता आहे. नागपूर पोलिसांनी जैनच्या घरातून २६ कोटी ४० लाख रुपयांचे घबाड जप्त केले. त्यात १२.४ किलो सोने, २९४ किलो चांदी आणि १६ कोटी ९० लाख रोख रकमेचा समावेश आहे.या प्रकरणातील मुख्य आरोपी दुबईला पळून गेला आहे.

नागपुरातील व्यापारी अग्रवाल यांचा मित्र अनंत जैन याने मैत्रीचा गैरफायदा घेत त्यांची आर्थिक फसवणूक करण्याची योजना आखली. जैन याने विदेशा-तील काही सॉफ्टवेअर तज्ञाच्या माध्यमातून बनावट "गेमिंग एप' तयार केले. या एपमधील गेमवर कमी पैसे गुंतविल्यास लगेच नफा देण्यात येत होता तर जास्त पैसे लावल्यास हरविण्यात येत होते. अग्रवाल यांना अनंत जैन याने "लिंक' पाठवून गेम खेळण्यास प्रोत्साहित केले. अग्रवाल यांनी सुरुवातीला लाखांमध्ये रक्कम गुंतवली. त्यांना दुप्पट परतावा मिळाला. मात्र, त्यांनी कोटींमध्ये रक्कम गुंतविल्यानंतर रक्कम थेट हडप करण्यात येत होती. फसवणुकीचा प्रकार लक्षात आल्यानंतर अग्रवाल यांनी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे तक्रार केली. आयुक्तांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊन अनंत जैनच्या घरावर छापा घा-तला. जैनच्या घरात कोट्यवधीचे घबाड पोलिसांच्या हाती ला-गले. पोलिसांनी रोख रक्कम, सोने- चांदीसह जवळपास १०० कोटी रुपये किंमत असलेल्या १२ संपत्तीचे दस्तावेज जप्त केले.जैनच्या बँकेचे लॉकर आणि खाते गोठविण्यात येणार आहे

नोव्हेंबर २०२१ मध्ये आर-ोपी अनंत जैन आणि त्याच्या साथीदाराला ऑनलाइन गेममध्ये २४ तास सट्टा लावून नफा कमावण्याचे आमिष दाखवले. अधिक नफ्याच्या लालसेपोटी हा व्यावसायिक त्यात अडकला आणि २०२१ ते २०२३ या कालावधीत त्याने सुमारे ६३ कोटी रुपये या गेममध्ये खर्च केले. सुरुवातीला व्यापाऱ्याला नफा झाला असला तरी नंतर त्याला नुकसान होऊ लागले. बेटिंगमध्ये गमावलेले पैसे परत मिळवण्यासाठी पीडितेने मित्र आणि नातेवाईकांकडून पैसे घेऊन सट्टेबाजी सुरू केली. पण तो हरत राहिला.

ऑनलाइन गेमच्या नावाखा-ली आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्याने आरोपीला पैसे परत करण्यास सांगितले, मात्र पैसे देण्याऐवजी आरोप-ीने पीडितेला जीवे मारण्याची धमकी देत ४० लाख रुपयांची खंडणी मागितली. व्यावसायिकाने सायबर पोलिसात सतत छळ आणि ५८,४२,१६,३०० रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार दाखल केली.

ऑनलाइन गेममधील एवढी मोठी घटना समोर येताच सायबर पोलीस आणि गुन्हे शाखेने कारवाईत रात्रीच आरोपींच्या गोंदियातील अड्ड्यावर छापा टाकला. पोलिसांनी आरोपीच्या घरातून १२.४ किलो सोने, २९४ किलो चांदी आणि १६ कोटी ९० लाख रोख रकमेचा समावेश आहे नोटा मोजण्यासाठी बँकेतून मशीन मागवण्यात आले होते. छाप्याचा पहिला आरोपी अनंत जैन हा दुबईला पळून गेला. १० तास ऑन कॅमेरा ही चौकशी करण्यात आली. यात नागपूर येथील ८ व गोंदिया गुन्हे शाखेचे ६ असे १४ पोलीस कर्मचारी तपासणी पथकात होते. कारवाईच्यावेळी शासकीय पंच ठेवण्यात आले होते, जेणेकरुन न्यायालयात बाजू मांडताना अडचण जाऊ नये.

गोंदिया शहराच्या सिव्हील लाईन भागातील काका चौकात जैन यांचे घर आहे. अंनत उर्फ सोंटू नवरतन जैन यांचे गोंदिया शहराच्या मुख्य बाजार पेठेत कुर्त्याचे दुकान आहे. त्यांना गोंदियात कुर्तेवाला म्हणून ओळखले जाते. मात्र कुर्ते व्यापाराच्या आड त्यांचा मुलगा अनंत हा ऑनलाईन गेमिंग खेळवित असे. नागपुरातील एका प्रसिद्ध व्यापाऱ्याच्या मुलगा हा ऑनलाईन गेम खेळताना गोंदियातील अंनत जैन यांच्या संपर्कात आला. फसवणूक झाल्याचे त्या नागपूरच्या तरुणाच्या लक्षात आल्याने त्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असता हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीची स्थापना

या प्रकरणाची माहिती देताना नागपूरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. ज्यामध्ये गुन्हे शाखेचे अधिकारीही सामील आहेत. आम्ही आरोपींविरुद्ध आयटी, फसवणूक, फौजदारी अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. प्राथमिक तपासात या ॲपच्या माध्यमातून इतर लोकांशी फसवणूक केल्याचेही समोर आले आहे. मात्र, आतापर्यंत एकच प्रकरण समोर आले आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

छत्तीसगढ-उडीसात गुन्हे दाखल

अनंत जैनचा काळाबाजार देशभरात पसरला होता. त्यामफसगत झालेल्या काही व्यापाऱ्यांनी छत्तीसगढ आणि उडीसा राज्यातील पो-लीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. उडीसातील एका व्यापाऱ्याने एकाच दिवसात ४४ लाख रुपये हारल्यानंतर आत्महत्या केली. त्या प्रकरणात अनंत जैनविरुद्ध उडीसात गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. पीडितांची संख्या वाढणार अनंत जैनने बनावट अँपच्या माध्यमातून हजारो गुंतवणुकदारांना कोट्यवधीची फसवणूक केली आहे. नागपुरातील जवळपास १०० व्यापाऱ्यांना अनंत जैनने लुटले असून त्याच्या विरोधात हळूहळू तक्रारी समोर येत आहेत. जैनने फसविलेल्या व्यापाऱ्यांनी न घाबरता समोर येऊन तक्रार देण्याचे आवाहन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केले.

आरोपीचे देश-विदेशातील एजंट हजर आहेत

आरोपी जैन हा क्रिकेट बुकी म्हणूनही काम करतो. आरोपी जैन याने या गेमिंग ॲपची लिंक देशातील इतर राज्यातील तसेच परदेशातील त्याच्या एजंटला दिली असून, त्यामुळे आणखीही अनेकांची अशा प्रकारे फसवणूक केल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. ही संपूर्ण कारवाई गोंदिया पोलिसांसह नागपूर गुन्हे शाखा आणि सायबर पोलिसांनी केली आहे. येत्या काही दिवसांत या प्रकरणात आणखी अनेक जण पुढे येण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

विकास कामांना गती देण्यासाठी आ. विनोद अग्रवाल एक्टीव

गोंदिया : गोंदिया विधानसभा क्षेत्राला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमदार विनोद अग्रवाल सतत प्रयत्नरत आहेत. भौतिक विकासासह विधानसभा क्षेत्रात शैक्षणिक, आरोग्य विषयक, पुनर्वसन व व्यक्तिक विकासाच्या योजनांना पुढे नेण्यासाठी आमदार विनोद अग्रवाल हे एक्टीवर मोडवर आले आहेत. दरम्यान जिल्हाधिकारी गोतमारे यांच्या नेतृत्वात आढावा घेवून विकासात येणाऱ्या अडअडचणी त्वरित मागी लावण्यात यावे, असे सुचना त्यांनी यंत्रणेला केल्या.

गोंदिया शहराच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करून देणे, आयुष रुग्णालय, बाई गंगाबाई रुग्णालय, एमसीएचसाठी जागा आरक्षित करणे, केंद्रीय विद्यालयासाठी जागा उपलब्ध करणे, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह व सामाजिक न्याय विभागांतर्गत मुलींच्या वसतीगृहासाठी जागा निश्चित करणे, जिल्हा ग्रंथालय व पत्रकार भवन, माहिती कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून प्रसस्त इम ारत बांधणे, परसवाडा गावांतर्गत येणाऱ्या बटालीनय कॅम्प परिसरात रस्ते व अतिक्रमणाचा प्रश्न मार्गी लावणे, यासह अनेक मुद्यांना घेवून आमदार विनोद अग्रवाल यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व विभागांची आढावा बैठक घेतली. पान २ वर

पुराचे पाणी घरात शिरल्याने झालेल्या नुकसानाबद्दल पाच हजारांऐवजी प्रतिकुटुंब दहा हजारांची मदत

मुंबई :- पुराचे पाणी घरात शिरल्यामुळे नुकसान झालेल्या पूरग्रस्तांना प्रतिकुटुंब दिल्या जाणाऱ्या पाच हजार रुपयांच्या मदतीमध्ये यंदा वाढ करण्यात आली असून पूरग्रस्तांना यंदा पाच हजार रुपयांऐवजी प्रति कुटुंब दहा हजार रुपयांची मदत केली जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत आणि विधानपरिषेदतही केली.

राज्य आपत्ती प्रतिसाद मदत निधीच्या निकषांमध्ये दुकानांसाठी मदत अनुज्ञेय नसली तरी, अधिकृत दुकाने आणि टपरीधारकांनाही नुकसानीपोटी मागील वर्षाप्रमाणे मदत दिली जाईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सभागृहात स्पष्ट केले. २५ जुलै रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरचित्र संवाद प्रणालीद्वारे संपर्क साधून संपूर्ण राज्यातील अतिवृष्टी आणि पूरस्थितीचा आढावा घेण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी स्पष्ट केले.

राज्यात सुरु असलेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी आणि नागरिकांच्या पाठिशी राज्य सरकार भक्कमपणे उभे असून बाधितांना मदत करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी केला. राज्यातील अतिवृष्टी, पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम जिल्ह्यातील परिस्थितीबाबत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सभागृहात निवेदन केले.



उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, गेल्या वर्षी पावसाळ्यात अतिवृष्टी, पूर, गोगलगायींचा प्रादुर्भाव, सत-तचा पाऊस यामुळे शेतपिकांच्या झालेल्या नुकसान भरपाईकरिता ८ हजार ६७७ कोटी तर यंदा मार्च व एप्रिल महिन्यात झालेल्या अवेळी पावसाने झालेल्या शेतपिकांच्या नुकसान भरपाईसाठी ५१३ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. गेल्या वर्षी सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतपिकांच्या नुकसान भरपाईसाठी १५०० कोटी रुपये मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. डीबीटी प्रणालीमार्फत ६०० कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांनी संगणकीय प्रणालीमध्ये मंजूर केली असून ती लवकरच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होईल.

राज्याचे आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील यांनी यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिमसह अनेक जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाचा दौरा केला आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले.

धोकेदायक परिस्थिती असलेल्या भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. पूरस्थितीमुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत तातडीने द्यावी, शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरु करावेत, ज्या ठिकाणी शेतजमिनी खरडून गेल्या असतील त्या ठिकाणीदेखील पंचनामे त्वरित सुरु करावेत, बाधित व्यक्तींना स्वस्त धान्य दुकानातून धान्याचे वाटप तातडीने, त्याच दिवशी होईल याकरिता प्रशासनाने स्वस्त धान्य दुकानांना पुरेसा धान्याचा पुरवठा करावा, ज्यांच्या घरात पुराचे पाणी शिरले होते त्यांना सध्याच्या दराने पाच हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची कार्यवाही तातडीने सुरु करावी, रोगराई पसरु नये याकरिता स्वच्छता करणे, औषध फवारणी करणे यासारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, ज्या ठिकाणी पाणी दूषित झाले आहे, त्याठिकाणी स्वच्छ पाणीपुरवठा होण्यासाठी आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित कराव्यात, गरज असेल त्या ठिकाणी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, ज्याठिकाणी अतिवृष्टीमुळे रस्त्यांची हानी झाल्याने गावांचा संपर्क तुटलेला आहे, अशा रस्त्यांची बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्ती करावी, पुरामुळे ज्या शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य खराब झाले आहे त्यांना शिक्षण विभागाने शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे, आदी सूचना प्रशासनाला देण्यात आल्या असल्याचेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे.

पाहिजेत

कृष्णा सहयोगी तंत्र शिक्षण संस्था देवरी द्वारा संचालित छत्रपती शिवाजी ज्यु.कॉलेज ऑफ एज्युकेशन (डी.एल.एड.) मु.पो.ता.देवरी जि.गोंदिया येथे सत्र २०२३-२४ करीता खालील पदे त्वरित भरावयाचे आहेत

अ.क्र.	पदाचे नाव	विषय	पदसंख्या	शैक्षणिक पात्रता
१	प्राचार्य	----	१ पद	M.A./M.Sc.M.Ed.with 55% marks शिकविण्याचा ५ वर्षाचा अनुभव
२	अधिव्याख्याता	पायाभूत शिक्षक	१ पद	M.A./M.Ed 55% गुणांसह किंवा M.Sc/ M.Ed.55% गुणांसह M.A.in Education 55% गुणांसह
३	अधिव्याख्याता	इंग्रजी,गणित,विज्ञान सामाजिक अभ्यास	३ पद	M.A./M.Sc/B.Ed 55% गुणांसह
४	अधिव्याख्याता	संगीत चित्रकला	१ पद	M.A.in Fin Arts/Music संगीता विशारद 5% गुणांसह
५	अधिव्याख्याता	शारीरिक शिक्षक	१ पद	M.P.Ed 55% गुणांसह पदवीधर
६	ग्रंथपाल	---	१ पद	B.Lib/M.Lib
७	वरिष्ठ लिपीक	----	१ पद	पदवीधर MS-CIT
८	संगणक निदेशक तथा भांडारपाल	----	१ पद	पदवीधर MS-CIT
९	परिचर	----	१ पद	१० वी १२ वी

इच्छुक अर्हताधारक उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेच्या व इतर दाखल्यासह दि.०८/०८/२०२३ रोजी मंगळवार ५.०० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी ज्यु.कॉलेज ऑफ एज्युकेशन (डी.एल.एड.) कार्यालय मु.पो.ता.देवरी जि.गोंदिया येथे अर्ज करावे.

ऑफिस मो.नंबर
९५४५४४३३२५
७४४७८८५१४५

कार्यवाह
कृष्णा सहयोगी तंत्र शिक्षण संस्था देवरी
ता.देवरी, जि.गोंदिया

दोन जहाल छत्तीसगडी नक्षलवाद्यांचे गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण

गडचिरोली : अनेक खून आणि जाळपोळीच्या घटनांमध्ये सहभागी असलेल्या दोन छत्तीसगडी जहाल नक्षलवाद्यांनी सोमवारी (दि.२४) गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. त्या दोघांवर मिळून एकूण ८ लाख रुपयांचे ईनाम होते. त्यांना राज्य शासनाच्या आत्मसमर्पण योजनेनुसार सर्व लाभ दिले जातील, अशी माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी सायंकाळी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी एएसपी (अभियान) अनुज तारे, एएसपी (प्रशासन) कुमार चिंता यांच्या उपस्थितीत नीलोत्पल यांनी आत्मसमर्पित नक्षलवाद्यांना शांततेचे प्रतीक असलेला पांढरा दुपट्टा आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले.

अडमा जोगा मडावी आणि टुगे कारू वड्डे अशी त्या नक्षलवाद्यांची नावे असून ते छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. अडमा मडावी हा २०१४ पासून नक्षल चळवळीत रुजू झाला. सध्या तो झोन ॲक्शन टिममध्ये कार्यरत होता. पण जून २०२३ ला दलम सोडून तो घरी परतला होता. त्याच्यावर चकमकीचे ८, खुनाचे ५, जाळपोळीचा १ आणि इतर २ असे गुन्हे आहेत. छत्तीसगडमध्ये २०१७ मध्ये बुरकापाल जंगल परिसरात झालेल्या पोलील जवानांसोबतच्या चकमकीत त्याचा सहभाग होता. यावेळी सीआरपीएफचे २५ जवान शहीद झाले होते. याशिवाय भूसुरुंग स्फोट व इतर हिंसक घटना घडवून आणण्यात त्याचा सहभाग होता. ५ निरपराध नागरिकांच्या हत्येचाही त्याच्यावर आरोप आहे. त्यामुळे शासनाने त्याच्यावर सहा लाखांचे ईनाम ठेवले होते.

दुसरा नक्षलवादी टुगे कारू वड्डे हा २०१२ मध्ये नक्षल दलमध्ये सहभागी होऊन २०२३ पर्यंत कार्यरत होता. काही दिवसांपूर्वीच तो घरी आला होता. त्यावर ६ निरपराध नागरिकांच्या हत्येचा तसेच रस्त्याच्या कामावरील १२ ट्रॅक्टर, जेसीबी वाहनांची जाळपोळ केल्याचा गुन्हा आहे. त्याच्यावर दोन लाखांचे ईनाम होते.

आत्मसमर्पणामुळे त्यांच्यावरील गुन्हे मागे घेण्यासोबत त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाकडून रोख रकमेसह जमीन, घरकुलासारखे लाभ त्यांना मिळणार आहे. विशेष म्हणजे येत्या २८ जुलै ते ३ ऑगस्टदरम्यान नक्षलवादी दरवर्षी शहीद सप्ताह पाळतात. या सप्ताहात हिंसक कारवाया करण्यावर नक्षलवाद्यांचा भर असतो. त्या पार्श्वभूमीवर जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करणे पोलिसांचे यश आहे. गेल्या वर्षभरात १२ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे.

मंडल यात्रेचे ३१ जुलै रोजी आमगाव येथे आगमन

आमगाव: ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यांत मंडल आयोगाबाबत जागृती व्हावी व त्यांना त्यांचे अधिकार आणि हक्क समजावून सांगण्यासाठी मंडल दिनानिमित्त विदर्भातील सात जिल्ह्यात मंडल आयोग जनजागृती यात्रा निघणार आहे.

या मंडल यात्रेचे ३१ जुलै रोजी आमगाव शहरात आगमन होत आहे. याकरिता तालुक्यातील ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी आदि समाजातील अन्य संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक झाली.

७ ऑगस्ट मंडल दिनाच्या औचित्याने ३० जुलै ते ६ ऑगस्ट दरम्यान भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा आणि ना-गपूर या जिल्ह्यात मंडल आयोग जनजागृती यात्रा निघणार आहे. ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समाजातील विविध प्रश्न आणि त्यावरील उपायावर चर्चा, विद्यार्थी, युवक, अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये जागृती, ओबीसींचे वसतिगृह महाज्योती आणि ओबीसी आर्थिक विकास महामंडळाच्या योजना, शिष्यवृत्तीचा लाभ, ओबीसींची जनगणना आदी अनेक विषयांवर बैठकीत चर्चा करण्यात आली होती.

यामध्ये ३१ जुलै रोजी आगमन झाल्यावर बाईक रॅली काढून मंडल यात्रेचे नगर भ्रमण करुन सालेकसा रोडवरील साई लॉन सभागृहात प्रबोधन सभारंभाचे कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले.

या बैठकीला विनायक येडेवार, देवचंद बिसेन, डॉ. गुरुदास येडेवार, सावन कटरे, संजय बारसे, मुकेश उज-वणे, ॲड. बागडे, सुरेंद्र मेंढे, राधाकिसन चुटे, नरेंद्र कावळे यांच्यासह ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ, ओबीसी कर्मचारी-अधिकारी महासंघ व ओबीसी संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित राहतील.

ओबीसी व्हिजेएनटी, एसबीसी यांच्या वतीने

मंडल जनजागृती यात्रा

गोंदिया जिल्ह्यात

३१ जुलै रोजी सायंकाळी ५.०० वाजता सांई मंगलम सभागृह सालेकसा रोड आमगाव येथे सभा

१ ऑगस्ट-साखरीटोला,देवरी,कोहमारा,नवेगावबांध, अर्जुनी-मोरगाव मार्गे लाखांदूरकडे प्रयाण.

विनीत - ओबीसी अधिकार मंच, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ, सर्व समाज ओबीसी संघ, संघर्ष वाहिनी, संविधान मैत्री संघ, महात्मा फुले समता परिषद, भारतीय पिछडा सोसित संघटना, ओबीसी जनमोर्चा, संभाजी ब्रिगेड, युवा बहुजन मंच व सर्व ओबीसी बहुजन संघटना

8080815329 / 9158240215 / 9689211025 / 9421796371
9158822121 / 9271422525 / 9881346225 / 9881743837
9422951513 / 9404314301 / 9226772816 / 9370415505

संपादकीय

माळीण, तळीये, इर्शाळवाडी; आता तरी धडा घेणार का ?

यंदा मोठी ओढ देऊन विलंबाने आलेल्या मान्सूनने आता चांगलेच बस्तान बसविले असून तो राज्यात सर्वदूर पोहोचला आहे. त्याच्या येण्याने बळीराजासह सर्वचजण सुखावले जरी असले तरी काहीजणांच्या आयुष्यावरच त्याने घाला घातला आहे. विशेषत: कोकणात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाल्यामुळे हाहाकार उडाला आहे. जोरदार पावसामुळे बुधवारी रात्री ११ च्या सुमारास रायगडमधील खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी गावावर डोंगराचा काही भाग कोसळून गावच्या गाव दरडीखाली गुडूप झाले असून अनेक कुटुंबच्या कुटुंब ढिगाऱ्याखाली गाडली गेली आहेत. ढिगाऱ्याखालून ७५ जणांना बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले असले तरी, १०० हून अधिक लोक ढिगाऱ्याखाली दबले गेले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खालापूर येथील इर्शाळ गडाच्या पायथ्याशी असलेल्या वसाहतीवर दरड कोसळली. या वसाहतीत आदिवासी ठाकूर समाजाची घरे आहेत. खालापूरमधील चौक गावापासून ६ किलोमीटर अंतरावर डोंगरदऱ्यांच्या भागात मोरबे धरणाच्या वरच्या बाजूला ही आदिवासी वाडी आहे. या दुर्घटनेचे वृत्त कळताच एनडीआरएफच्या दोन तुकड्या घटनास्थळी दाखल झाल्या. मात्र, अंधार व पावसामुळे बचावकार्यात अडथळा येत होता. तसेच, गावापर्यंत जाण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे बचावपथकांना अक्षरश: चिखल तुडवून गावापर्यंत जावे लागले. त्यातच पावसाचा धिंगाणा सुरूच होता. त्यामुळे रात्री बचावकार्य थांबवण्यात आले होते. तसेच, रात्री मदतीसाठी जात असताना अग्निशमन दलाच्या एका जवानाचाही हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. नंतर सकाळ होताच वेगाने बचावकार्य सुरू झाले आहे.

या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील भाजप महायुतीचे सरकार खूपच संवेदनशील असल्याचे दिसले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रात्रीच स्थानिक प्रशासन, यंत्रणा यांच्याशी संपर्क साधून तत्काळ बचाव व मदत कार्य सुरू करण्याचे आदेश दिले. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या दोघांनीही आपत्ती व्यवस्थापन कक्षात उपस्थित राहून संबंधित घटनेचा सतत आढावा घेऊन आवश्यक त्या सूचनाही केल्या. मुख्यमंत्र्यांनी नंतर घटनास्थळावर धाव घेत या दुर्घटनेत वाचलेल्या ग्रामस्थांना भेटून त्यांना धीर दिला. त्यांना लागेल ती सर्व मदत सरकारकडून केली जाईल असे सांगून आश्वस्त केले. तसेच घटनास्थळी मदतकार्य वेगाने व्हावे यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या. तत्पूर्वी मंत्री गिरीश महाजन यांनी मध्यरात्री घटनास्थळी पोहोचून बचाव आणि मदत कार्याबाबत मार्गदर्शन केले. मुख्यमंत्र्यासोबतच मंत्री उदय सामंत, दादा भुसे यांनी घटनास्थळी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. दुर्घटनेतील जखमी नागरिकांवर कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विइर्शाळवाडीपर्यंत जाण्यासाठी रस्ताच नव्हता. पावसामुळे जी पायवाट आहे, ती पूर्ण चिखलात गेली आहे. बचावपथकांनाही पायीच तेथे जावे लागत आहे. जेसीबी, पोकलेनही घटनास्थळी नेणे शक्य होत नाहीय. त्यामुळे बचाव पथकाचे सदस्य अक्षरश: हातानेच ढिगारे उपसत आहेत. गावापर्यंत मदतीचे साहित्य कसे न्यावे, हा मोठा प्रश्न उभा होता. त्यामुळे ढिगाऱ्याखाली सापडलेल्या मृतदेहांचे गावातच शवविच्छेदन केले जाण्याची शक्यता आहे.

या घटनेनंतर काही वर्षांपूर्वी घडलेल्या दरड कोसळण्याच्या घटनांची यावेळी पुन्हा आवर्जून आठवण आली. पाऊस पडावा म्हणून वरुण राजाची प्रार्थना करणारे मौजे माळीण गावातील ग्रामस्थ असेच आदल्या रात्री गाढ झोपी गेले होते; परंतु त्या रात्री एवढी अतिवृष्टी झाली की, पहाटेपूर्वीच त्या गावातील जीवनच संपुष्टात आले. ३० जुलै २०१४ रोजी भल्या पहाटे माळीण गावावर काळाने घाला घातला. ही भीषण दुर्घटना घडली त्यावेळी माळीण गावच्या डोंगरात स्फोट सदृश आवाज झाला व मातीचा ढिगाराच्या ढिगारा, चिखल व उन्मळलेली झाडे अचानक खाली घसरुन येऊ लागली. डोंगर कोसळला, दरड कोसळली आणि त्या मातीच्या ढिगाऱ्याखाली संपूर्ण गावच क्षणार्धात गायब झाले होते. गावातील घरे, पुरुष, स्त्री, लहान मुले, गाई, म्हशी, शेळ्या-मेंढ्यासहित मातीच्या ढिगाऱ्याखाली गेले. हे गाव क्षणार्धात होत्याचे नव्हते झाले होते. डोंगर कोसळून एवढी मोठ्या प्रमाणात क्षणात घडलेल्या जीवित हानीची राज्यातील ही पहिलीच दुर्घटना होती. या दुर्घटनेमुळे माळीण गावच भूगोलाच्या नकाशावरुन कायमचे पुसले गेले. माळीण गावची ही दुर्घटना म्हणजे राष्ट्रीय आपत्ती ठरली होती. केंद्र सरकार, राज्य सरकार व इतर नावाजलेल्या संस्थांकडून मदतीचा ओघ त्यावेळी सुरू झाला. माळीण गावातील सर्व घरांचे व आजूबाजूच्या अन्य घरांचे पुनर्वसन, संसारोपयोगी वस्तू पुरविण्याचा निर्णय व मृत व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत देण्याचे आश्वासन राज्य सरकारकडून करण्यात आले. अशा प्रकारच्या आपत्तीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून संपूर्ण पश्चिम घाटातील धोकादायक परिसराचे व गावांचे शास्त्रीय सर्वेक्षण घेतले जाण्याचे ठरले. पण त्यानंतर २४ जुलै २०२१ रोजी रायगड जिल्ह्यातील महाडमधील तळीये गावही अशाच प्रकारे दरड कोसळून पूर्णत: गुडूप झाले होते. माळीण दुर्घटनेमागे नैसर्गिक कारणे मुख्यत्वे जबाबदार असल्याचे नमूद केले आहे. त्यात शेतीसाठी जमिनींचे सपाटीकरण व त्यासाठी केलेली जंगलतोड अशी भूस्खलनाचे प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट केले आहे. रायगडसह अन्य जिल्ह्यांतही दरड कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत. राज्यातील लागोपाठ होणाऱ्या दरडी कोसळण्याच्या या भीषण दुर्घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी शासनाने काही ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच सरकारने अशा दुर्घटना टाळण्यासाठी दगडग्रस्त गावांचे स्थलांतर करण्याची आवश्यकता असल्याचे अधोरेखित होत आहे.

सत्यशोधकी साहित्यातील स्त्री प्रतिमा



सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

आपल्या प्राचीन भारतामध्ये जैन, बौद्ध, शाल, लोकायत व शैव या परंपरा होत्या. त्यांनी वर्णजती व्यवस्थेला नकार दिला आणि स्त्री-पुरुष समानतेला महत्व दिले. एका अर्थाने ही सत्यशोधकी साहित्याची पूर्व पीठिका होती असे म्हणता येते.

आधुनिक काळात महाराष्ट्रात २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. महात्मा जोतीराव फुलेंनी हा समाजा स्थापनेपुर्वी निर्मिकाचा शोध नावाची छोटी पद्यपुस्तिका लिहिली. तीच सत्यशोधकी साहित्य निर्मितीची उगम स्थान मानता येईल. सत्यशोधकी साहित्य म्हणजे गुलामगिरीला नकार, पिडीत, अन्यायग्रस्त व शोषित यांची बाजू मांडणारे साहित्य म्हणजे सत्यशोधकी साहित्य होय. मानवतामूल्यांच विवेवनिष्ठतेचा पुरस्कार करणरे साहित्य म्हणजे सुद्धा सत्यशोधकी साहित्य म्हणता येईल.

महात्मा फुले यांच्यापासून सुरु झालेली ही परंपरा पुढे त्यांच्या कार्यकर्त्यांनी निषंठेने कमी-अधिक प्रमाणात चालू ठेवली. ही मंडळी विशेषत: ग्रामीण भागातील खेडूत समजली जाणारी होती. नागरी परंपरा असणारी होती. ही मंडळी म्हणजे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्तेच होते. ते असे प्रत्यक्ष समाजात सक्रिय कार्य करीत होते. तसेच कृतिशील बनून येथील ब्राम्हणी व्यवस्थेशी लढत होते. त्यातील काही जण आपल्या जाणिवा, भावना शब्द-बद्ध करुन विविध वर्तमानपत्रे, नियतकालिके व छोट्या-छोट्या पुस्तिकेच्या माध्यमातून मांडून समजापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत होते. याच साहित्यामधून दलित साहित्याचा उगम झाला असेही म्हणता येते.

सत्यशोधकी साहित्याकडे आद्यत्वाचा म्हणजे प्रथमतेचा मान अनेक कारणांमुळे येतो. स्वतंत्र सामाजिक नाटक, कादंबरी, कथा, कविता इत्यादी सत्यशोधकांनी इतरही साहित्य प्रकार हाताळलेले आहेत. त्यामध्ये खंडकाव्य, विडंबन काव्य, लौकिक अभंग, पोवाडे, लावण्या, सामाजिक आशयाची कविता, जलशांची पदे, छक्कडसारखा प्रकार, स्त्री लेखनीच्या दृष्टिकोनातून जागतिक पातळीवरची आद्य स्त्रीवादी लेखिका, वृत्तपत्रांची संपादिका अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून सत्यशोधकी साहित्य पुरविल्या गेले. या साहित्यात स्त्रियांचे प्रश्न घेऊन जेवढे लिहिल्या गेले तेवढे क्वचितच इतर साहित्यात लिहिले गेले असेल, याचे कारणही तसेच आहे.

कारण महात्मा फुलेंचे स्त्रियासंबंधी व त्यांच्या शोषणासंबंधीचे विचार, पुरुष-सत्ताक अर्थात ब्राम्हणी व्यवस्थेला विरोध हा आहे आणि म्हणूनच या साहित्यात स्त्रियांच्या रेखाटलेल्या प्रतिमा ह्या इतर साहित्यापेक्षा वेगळ्या आहे. हे स्पष्ट दिसून येते. महात्मा फुलेंनी स्त्रीचे श्रेष्ठत्व मान्य केले त्याचबरोबर त्यांनी ब्राम्हण स्त्रिया व बहुजन स्त्रिया यांच्या व्यक्तिरेखा सुद्धा वेगळ्या पद्धतीने रेखाटल्या आहेत. स्त्रियांच्या संबंधी विचार करताना त्यांनी जात हाच निकष ठरवला. त्यांनी वर्गवादाकडे लक्ष दिलेले नाही असे काही विचारवंत म्हणतात. त्याचे कारणही तसेच असावे. कारण या देशात `व्हा वर्ग निर्माणच झाले नव्हते. मध्यमवर्ग हा आताचा परिपोष होय.

सत्यशोधकी साहित्याचा विचार करता सर्वप्रथम आपणास महात्मा फुलेंनी रेखाटलेल्या स्त्री प्रतिमेचा विचार करावा लागेल. १९५४ साली महात्मा फुलेंचे मनुस्मृतीचा धिक्कार नावाचे एक लहानसे पुस्तक आले. या पुस्तिकेच्या उद्बोधनात तीन पृष्ठांचा मजकूर आहे. त्यामध्ये फुलेंनी या देशाला हिंदुस्थान न म्हणता बळीस्थान असे म्हटले आहे. या बळीस्थानात इंडियन लोकांची नदीकाठी वसलेली गावे होती. त्यामध्ये हे लोक आपआपले उद्योगधंदे एका विचाराने न्यायाने व नितीने करीत होती. ज्या ठिकाणी ती राहत त्यास गाव असे म्हटले जाई. त्या जागेस पांढरी (पांढरी आई) व ज्यामधून पिके काढण्यात येई त्यास काळीमही (काळी आई) असे म्हटल्या जात असे. याचाच अर्थ या देशात स्त्रीसत्ताक अर्थात मातृसत्ताक पद्धती होती असे म्हणता येते आणि त्यावेळी स्त्रियांना मानाचे स्थान होते, हेही यावरुन कळते. ज्या मनुस्मृतीमुळे स्त्रियांना गुलामीच्या यातना भोगाव्या लागतात. त्याच मनुस्मृतींना महात्मा फुलेंनी शैतानाची शिफारस करणारे शास्त्र असेसुद्धा म्हटले आहे.

महात्मा ज्योतीराव फुले यांनी तृतीय रत्न या नाटकामध्ये धीट शेतकरी स्त्रीची प्रतिमा रेखाटली आहे. या नाटकामध्ये ग्रामजोशी हा शेतकरी बाईच्या दारात येऊन तिथी, वर, नक्षत्र, योग सांगून तिच्या हातातील कोरडी भिक्षा पाहून मनातल्या मनात संतापतो. म्हणजे शिक्षा हा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि त्याची दक्षिणा त्याला मिळालीच पाहिजे म्हणून तो शुद्र म्हटल्या जाणाऱ्या स्त्रीवर संतापतो. परंतु हीच शेतकरी माळ्या कुणब्यांची बाई ऐतखाऊ जोशीला धीटपणे सांगते की, आता आमीच तुमच्या पोटाची काळजी कुळपर्यंत घ्यायची तुम्ही एखादा रोजगार धंदा करा.

या नाटकातील कुणब्याची बायको आणि कुणबी यांना जीवनविषयक खरा दृष्टीकोन कळतो व आधुनिक विद्येमुळे आपल्याला सत्य-असत्य ओळखता येईल तशी कुवत निर्माण होईल हेही फुले या नाटकातील स्त्री पात्रातून स्पष्ट करतात. तसेच पुरुषांनी अगोदर जेवावे, असे भटीशास्त्रात म्हटले असताना फुले जोगाई व त्याची बायको याचे उदाहरण देऊन समानता पटवून देतात.

१८६९ साली छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा महात्मा फुलेंनी लिहिला. या पोवाड्यातून त्यांनी मराठी स्त्री-पुरुषांचे शौर्य यातून मांडले. त्यामध्ये त्यांनी जिजाबाईंना वीर जाधवांची शूर कन्या अशा शब्दात गौरव केला. शहाजीराजांनी केलेल्या दुसऱ्या पत्नीमुळे जिजाबाईंच्या दु:खाचे वर्णन करताना त्यांनी सवत केल्यावर स्त्रियांना काय दु:ख होते हे मांडताना म्हटले, नित्य पतीचा आठव डोंगर, दु:खाचे झाले, घर सवतीने घेतले असा उल्लेख ते करतात. प्रस्तुत पोवाड्याचा शेवट त्यांनी एका राणीची म्हणजे स्त्रीसत्ता असूनही कशा रितीने ब्राम्हणशाही आहे याचे वर्णण केले आहे, एका अर्थाने हे आजही लागू आहे. बऱ्याच पक्षामध्ये स्त्रिया प्रमुख आहेत. त्या ब्राम्हण आहेत आणि त्यामुळे त्यांचा कारभार ब्राम्हणशाहीप्रमणे आहे हे दिसते. म्हणून त्यांच्याकडून बहुजन समाजाच्या भल्याची अपेक्षा करता येत नाही.

१८६९ साली ब्राम्हणांचे कसब या खंड काळाच्या चौथ्या भागात ऋतूशांतीच्या निमित्ताने तुप पोळ्यांचे भोजन करुन दोन दक्षिणेची चंगळ ब्राम्हणाचे कसब कशारितीने करतात ते मांडले आहे. मुलींना सृष्टीचक्राप्रमाणे निसर्गनियमाने ऋतू प्राप्त होतो, परंतु ऋतूप्राप्ती हा स्त्रित्वाचा निसर्गाने केलेला सम्मान आहे. तिच्याभावी मातृत्वाचा गौरव आहे. त्यात अशुभ असे काहीच नाही. परंतु ब्राम्हण इच्छा भोजनासाठी ते करतात. या ठिकाणी स्त्रियांच्या मातृत्वाचा गौरव फुलेंनी केला आहे. याच अखंड काव्यात फुलेंनी पती वाल्याबरोबर तिच्या शोकाव्यवस्थेच्या स्थितीचे वर्णन केले आही ती अशी

स्त्री गरगर, घार जशी फिरे
अश्रुपातांचा लोट चाले,
हदयी काळीज होरपळे,
मनाला खाई, भिरभिर पाही,
पतिकडे वीट पाहिले,
जसे का आकाश कोसळले.

आणि अशा परिस्थितीतही तिच्याकडून भटजी गरुड पुराणाचे वाचन व दानधर्माची अपेक्षा ठेवतो.

गुलामगिरीमध्ये महात्मा फुले आईचा शिरच्छेद करणाऱ्या परशुरामास त्यांनी कुकर्मी संबोधन आहे. भटांच्या कृत्रिम ग्रंथामुळे संत्री गुलाम झाली आहे हेही त्यांनी गुलामगिरीमध्ये मोडले. शेतकऱ्यांचा असूडमध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या घरात लक्ष्मीला अंगभर कपडा व पोटभर अन्न मिळत नाही. अशा स्त्रीची दयनीय परिस्थिती आहे. ती कसून समुद्रापलीकडे तिच्या पित्याच्या घरी माहेरी गेली आहे. त्यांनी इंग्रजांना तिचे सख्खे भाऊ म्हटले आहे. ती तिकडे गेल्यामुळे आळस झटकून उद्योगधंद्यात तिने प्रगती केली. तेथील कुटुंबातील आबालवृद्ध तिकडे तिला समतेने वागवतात. म्हणून ती इकडे येत नाही. याच शेतकऱ्यांच्या असूडमध्ये त्यांनी बालविवाह व बहुपत्नी पद्धती विरोधी कायदा करावा हे सुचविले होते.

सार्वजनिक सत्यधर्मामध्ये त्यांनी स्त्री-पुरुष समानता कशी असावी सुचविले आहे. सीताप्रथा कशी वाईट आहे. गर्भवतींना गर्भपात करुन बालहत्या कराव्या लागतात. साधारणपणे स्त्रिया सोशिक, सहनशील, क्षमाशील, कष्टकरी व दयाळू असतात, पाणभिरू असतात. आजही आपण पाहतो की स्त्री-पुरुष गर्भपातामुळे स्त्री-पुरुष संख्येत विषमता निर्माण झाली आहे.

समताधिष्ठित समाजरचनेसाठी फुलेंनी स्त्रीला प्रथमतेचे स्थान दिले आहे. सत्यशोधक समाजाच्या लग्नविधीमध्येसुद्दा त्यांनी वधूला प्रथम स्थान दिले आहे. अखंडमध्ये फुलेंनी कुणबी स्त्रिया आणि भटीण स्त्रिया यांची तुलनात्मक वर्णने केली आहेत. भटीण स्त्री प्रतिमा कशाप्रकारे रेखाटतात, ते पाहावे लागेल. ते लिहितात,

भटीण न्हावून धाब्यावरी जाता,
केस वाळविताल, कांती फाके,
भटीणीचा इंगा विचारी दानिया,
काम मोह गदा, करी चेंदा
भटीणीला आहे कंचुकी सारं या,
सोहळ्याचा वीरभटा नाही,
तीर्थ यात्री आर्य अंगवस्त्रे नेती,
फुगड्या खेळती पंढरीस.

अशाप्रकारे महात्मा फुलेंनी तत्कालीन ब्राम्हण पुरुष आणि स्त्रिया यांचा अहंमपणाची मानसिकता अखंडात चित्रीत केलेली आहे.

दुसऱ्या बाजूने कुळंबिनी म्हणजे माळी, तेली, कुणबी यांच्या बायकांचे वर्णन करताना महात्मा फुले लिहितात,

कोंबडा आवर होता प्रात: काळी,
बसे जाती पाळी, शुद्र जायात,
गाण्याचा धिंगाणा भ्रतार उठतो,
बईलास नेतो चरावया,
नाही.... केरासह (३)
धूर्त आर्य तिला म्हणे कुळंबीण
गुणाचे कमीपणा.. ज्योती म्हणे.

यामध्ये महात्मा फुलेंनी शेतकरी स्त्रियांचा पहाटेपासूनचा दिनक्रम त्यांना दररोज कष्टाची जी-जी कामे करावी लागात त्यांची भावना, संवेदना आणि विचारांचाही अविष्कार घडविला आहे.

भटीण शेतात घंटानाद करी,
चाळे चाळे करी, ज्योती म्हणे.

फुलेंनी ब्राम्हण स्त्री व बहुजन स्त्रियांच्या समस्या वेगळ्या आहेत अशा प्रतिमा रेखाटल्या. तरीही त्यांना ब्राम्हण स्त्रीसुद्धा या व्यवस्थेने शुद्र ठरवून तिलाही पायातली वहाणच ठेवली याचाही धिक्कार केला. स्त्री शिक्षण, बालहत्या प्रतिबंधक गृह, केशवपण बंदी असे कार्यक्रमांमुळे ब्राम्हण स्त्रीयाच कैवार फुलेंनी घेतला तरी फुलेंना मानताना ब्राम्हण स्त्रिया दिसत नाही. आजही स्त्रीमुक्तीसारख्या काही चळवळी उच्चवर्णीयांच्या स्त्रिया चालवितात. त्यांना खरेच आमच्या शेतकरी, शेतमजूर, कामगार स्त्रियांचे प्रश्न समजतील का? हा एक प्रश्नच आहे. अशाप्रकारे शुद्रातिशुद्र स्त्रियांच्या प्रतिमा ब्राम्हणी साहित्यातील स्त्री प्रतिमेपेक्षा वेगळ्या तऱ्हेने महात्मा फुलेंनी रेखाटलेल्या दिसतात. याचप्रकारे इतर सत्यशोधकांनी सुद्धा स्त्री प्रतिमा आपल्या लेखनीतून रेखाटल्या आहेत.

अशाच प्रकारच्या प्रतिमा इतरही सत्यशोधकांनी आपल्या साहित्य निर्मितीतून निर्माण केल्या. असाच एक संवाद एका अज्ञात सत्यशोधकाने ब्राम्हणी स्त्री व मोलकरीण स्त्री यांच्या वेगळ्या समस्या घेऊन लेखन केले आहे. ब्राम्हण स्त्री म्हणते

तुझी सावली, भीती वाटली,
अमंगळ भारी,
सांगते पुन्हा तुज जा दुरी गं-दुरी,
मोलकरणी यावर तर्कशुद्ध उत्तर देते,
सूर्य सांजेस, मीही पुर्वेस सावली कैसी,
येईल तुझ्यावरी पश्चिमेस अगासी.

अशाप्रकारे सत्यशोधकांनी दोन्ही समाजातील स्त्रियांच्या समस्या वेगवेगळ्या प्रमाणे रेखाटल्या आहेत. उच्चवर्णी स्त्री स्वत:ला अहंकारी समजते.

तातोबा यादव व कासेगावकर यांनी सत्याचा शोधा नावाचे सत्यशोधकी जलशाचे पुस्तक लिहिले. या दोन भागात लिहिलेल्या पुस्तकात त्यांनी ब्राम्हणीशास्त्राची उलटतपासणी भट-भटणीचा झगडा या आधारे मांडली आहे. यामध्ये तातोबा यादव यांनी लिहिले आहे.

शेतकरणीचे हाल भटणीचे रथाळ,
शेतामध्ये करीता कष्ट,
निघे अंगाची साल ना,
शिद्रा अयता खाऊन पुष्ट भरणी झाल्या,बेताल, रात्रंदिवस घाली काष्ट पिकवाया
सर्वमाला घासुनी अभद्र उष्ट माष्ट किती
नीच साळ, नाही फुरसत बोलाया गोष्ट
सदोदीन रान माळ.
अशी व्यथा मांडली आहे.

उर्वरित भाग पुढील अंकात

मतदारांनी आपल्या घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे-मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे

मुंबई: राज्यात २० जुलैपासून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओ घरोघरी भेटी देऊन मतदारांच्या माहितीची पडताळणी करीत आहेत. आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणि भारत निवडणूक आयोगाच्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत हा उपक्रम राबवला जात असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिली.

संपूर्ण महिनाभराच्या काळात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदारांच्या घरी भेटी देतील. आपल्या या भेटींमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदारांचे वैयक्तिक तपशील, पत्ता आणि छायाचित्रांची पडताळणी करतील, मृत आणि स्थलांतरित मतदार, दुबार नोंदणी असलेले मतदार, मतदारांचाही शोध घेतील, तसेच मतदार ओळखपत्रासोबत आधार कार्ड जोडण्याची प्रक्रिया करतील. यासोबतच नव मतदार, तृतीयपंथी आणि भटक्या विमुक्त जाती जमातीतील मतदार, देह व्यवसाय करणाऱ्या महिला मतदारांचा शोध घेऊन त्यांची तसेच मतदार यादीत नाव नसलेल्यांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी करण्याचे कामही या काळात केले जाणार असल्याचे श्री. देशपांडे यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे राज्यातील मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाचे आणि अद्ययावतीकरणाचे काम सुलभ होऊ शकणार आहे. हा उपक्रम म्हणजे आपण आपल्या मताधिकारापासून वंचित राहू नये याची निश्चिती करण्याची नागरिकांसाठीची मोठी संधी आहे, असे श्री. देशपांडे यांनी सांगितले. त्यामुळेच हे अधिकारी आपल्या घरी येतील तेव्हा नागरिकांनी आपले स्वत:चे, कुटुंबातील सर्व सदस्यांची नावे मतदार यादीत आहेत की नाहीत हे तपासून घ्यावे, ज्यांनी वयाची १८ वर्ष पूर्ण केली आहेत पण अद्यापही मतदार नोंदणी केलेली नाही, अशांची मतदार नोंदणी करून घ्यावी. मतदार यादीतील आपला वैयक्तिक तपशील, पत्ता यात काही दुरुस्त्या असतील, तर त्यासाठीचे अर्ज भरुन द्यावेत. लग्नानंतर नाव बदललेल्या स्त्री मतदारांनी आपली नावे बदलून घ्यावीत, स्थलांतरित झालेल्यांनी नव्या पत्त्याची नोंद करुन घ्यावी, असे आवाहन श्री. देशपांडे यांनी केले आहे.

मतदारांच्या सहकार्यामुळेच हा उपक्रम यशस्वी होणार असल्याने, सर्व मतदारांनी त्यांच्या घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे आणि विनासंकोच आवश्यक ती माहिती आणि दस्तऐवज द्यावेत, असे आवाहनही श्री. देशपांडे यांनी केले आहे.

राज्यात स्वतंत्र जिल्हा परिषद युनियन स्थापन होणार-जे.एस.पाटील

गोंदिया:- विविध क्षेत्रातील संघटित आणि असंघटित कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्यात लवकरच स्वतंत्र जिल्हा परिषद युनियन स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. एस. पाटील यांनी दिली. येथील रेस्ट हाऊस मध्ये आयोजित कामगार संघटनांच्या सभेत ते अध्यक्ष पदावरून बोलत होते.

मंचावर MSEDCL चे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता बंडू वासनिक, स्वतंत्र विद्युत कंत्राटी कामगार संघटनेचे उपाध्यक्ष बंटी बडगे आणि गोंदिया जिल्हा स्वतंत्र मजदूर यूनियनचे जिल्हाध्यक्ष अरविंद साखरे उपस्थित होते.

असंघटित कामगारांच्या विविध मागण्यांवर चर्चा करुन त्यांच्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने ही सभा आयोजित करण्यात आली होती. श्री पाटील पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात ३२ जिल्ह्यात यूनियनचे काम युद्धस्तरावर सुरु आहे. पैकी नंदुरबार, शिंधुदुर्ग, पालघर आणि रत्नागिरी येथेही कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देण्याचे काम लवकरच सुरु होईल. असंघटित आणि संघटित कामगारांची शासन पिळवणूक करीत आहे असा आरोप त्यांनी केला. कामगार चळवळीच्या क्षेत्रात कंत्राटी आणि कंत्राटी महेचं शब्द नेहमी कानावर पडत असल्यामुळे हा शब्दच नकोसा वाटत आहे. ते पुढे म्हणाले की शंभर टक्के कामगारांपैकी ९३ टक्के असंघटित आणि ७ टक्के संघटित कामगारांचा समावेश आहे. तेव्हा कामगारांनी आपली इच्छाशक्ती प्रबळ ठेवून ध्ययपूर्ती साठी लढा देण्याची गरज आहे असे सांगून एक उदाहरण देऊन पटवून दिले. यावेळी मंचावर उपस्थित मान्यवरांनीही आपले विचार मांडले. श्री वासनिक म्हणाले कामगारांच्या संघटना तोडण्यासाठी सरकारने कंत्राटी पद्धतीचा अवलंब केला आहे. श्री बडगे म्हणाले की,कामगारांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग करुन वाघासारखं जीवन जगलं पाहिजे. श्री साखरे म्हणाले की,शासकीय न?करी करताना कर्मचारी हा आपल्या कर्मचाऱ्यांच्या नेहमी पाठीशी असतो., त्यामुळे संघटनाना बळकटी मिळते.

कार्यक्रमाचे संचालन स्वतंत्र विद्युत कंत्राटी काम गार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष धर्मेंद्र (छोटू)बोरकर यांनी केले, आभार MSEDCL चे उप कार्यकारी अभियंता अमित पाटील यांनी मानले. यावेळी मोठया संख्येने कामगार संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

आशा तेजराम भाजीपाले यांची सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदी निवड

गोंदिया : आदिवासी व नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळख असलेल्या देवरी तालुक्यातील छोट्या सालई या खेडेगावातील ॲड. आशा तेजराम भाजीपाले यांची नुकतीच एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत सहाय्यक सरकारी अभियोक्ता गट-अ पदी निवड झाली आहे. त्यांनी महाराष्ट्रातून मेरिट लिस्टम ध्ये ४६ वे स्थान मिळविले असून देवरीचे नाव लौकिक केले आहे.

आशा तेजराम भाजीपाले यांचे प्राथमिक शिक्षण व पदवी शिक्षण देवरी येथे झाले असून त्यांनी एल.एल.बी. एनएमडी कॉलेज गोंदिया येथे केले आहे. त्यांचा सदर परीक्षेचा सराव एक वर्षापासून सुरु होता व त्यांनी अथक परिश्रम करुन यश संपादन केले आहे. सदर यशाचे श्रेय त्यांनी आई-वडिल, पती प्रविण दळवी, मार्गदर्शक ॲड. प्रशांत संगीडवार, मित्र परिवार आणि कुटूंबियांना दिले आहे. आशा भाजीपाले यांचे देवरी तालुक्यासह गोंदिया जिल्ह्यात अभिनंदन करण्यात येत आहे.

पान १ वरुन-वसतीगृहासाठी जागा निश्चित करून तसे प्रस्ताव शासनाकडून त्वरित पाठविण्यात यावे, जिल्हास्तरावर कसलीही अडचण येऊ नये या बाबतची सुचना त्यांनी केली. झिरुटोला येथील काही शासकीय जागा कोरणीघाट बुद्धिस्ट समितीला कशी उपलब्ध करून देण्यात येईल, या बाबतचा आढावाही त्यांनी घेतला.सामूहिक वनहक्क अंतर्गत बनाथर येथील प्रलंबित असलेले दावे त्वरित निकाली लावण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, रजेगाव-काटी उपसा सिंचनाच्या कालव्यासाठी अधिगृहित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना त्वरित देण्याच्या संदर्भात निर्माण असलेली अडचण जाणून त्या शेतकऱ्यांना मोबदला त्वरित देण्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावे.पुजारीटोला, कासा या गावाचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात प्रस्ताव सादर करण्याच्या संदर्भातही चर्चा करण्यात आली.आमदार विनोद अग्रवाल यांनी विधानसभा क्षेत्राच्या सर्वांगिन विकासाला गती देण्याच्या अनुषंगाने आढावा घेतला. या बैठकीत जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, पं.स.सभापती मुनेश रहांगडाले यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे गुणवत्ता विकास वाढविण्यासाठी भविष्यवेधी शिक्षण प्रणाली योग्यप्रकारे राबवा-रविंद्र ठाकरे

गोंदिया : शाळेत सर्वांनी नकारात्मक वातावरण

ओबीसी वसतिगृहाची १५ ऑगस्टपासून अर्ज प्रक्रिया

इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांचे उत्तर

गोंदिया : २०२३-२४ शैक्षणिक सत्र सुरू झाले. परंतु, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्यात येणार असल्याचे आश्वासन राज्य शासनाने पूर्ण केले नाही. त्यामुळे आमदार अभिजित वंजारी यांनी यासंदर्भात विधानपरिषदेत लक्ष-वेधी प्रश्न उपस्थित केला. त्यावर आमदार अभिजित वंजारी, आमदार सुधाकर अडबाले यांनी अभ्यासपूर्ण विवेचन करीत सरकारला चांगलेच धारेवर धरले. त्यानंतर इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी ओबीसी वसतिगृहासाठी १३ जिल्ह्यांतून २२ इमारतींचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले. उर्वरित २३ जिल्ह्यांतील इमारती ३० जुलैपर्यंत अधिग्रहित करुन १५ ऑगस्टपासून अर्ज प्रक्रिया सुरू होईल, असे सांगितले.

राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे नोंदणीकृत विविध स्वयंसेवी संस्थांमार्फत सुरू करण्याबाबत मान्यता देण्यात आली होती. सदर वसतिगृहासाठी शासनाने स्वतः इमारत भाड्याने घेवून जिल्हानिहाय वसतिगृह कार्यान्वित करण्याचासुद्धा शासनाने निर्णय घेतला. त्यानंतर वसतिगृह सुरु करण्याच्या अनुषंगाने भाडेतत्वावर खासगी इमारती भाड्याने घेण्याबाबतची जाहिरातही प्रसिद्ध करण्यात

आली. परंतु, शैक्षणिक सत्र सुरू होऊनही राज्यातील एकाही जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू झाले नाही. त्यामुळे ओबीसी विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब आमदार अभिजीत वंजारी, आमदार सुधाकर अडबाले यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. तर, आमदार सुधाकर अडबाले यांनी राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणे ७२ शासकीय वसतिगृह, स्वाधार योजना व परदेशी शिष्यवृत्ती योजनेत संख्या वाढ या लक्षवेधी सूचनेवर लक्ष वेधले.

या विषयावर जवळपास अर्धा तास चर्चा झाली. त्यानंतर इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी, जवळपास १३ जिल्ह्यांतील २२ इमारती मिळाल्या आहेत. आणखी २३ जिल्ह्यात इमारती ३० जुलैपर्यंत अधिग्रहित करुन १५ ऑगस्टपासून अर्ज प्रक्रिया सुरू होईल. पुढच्या कॅबिनेटमध्ये आधार (स्वाधार) योजनेला मान्यता घेवून ऑगस्ट महिन्यात, प्रत्येक जिल्ह्यात ३०० मुले आणि ३०० मुली याप्रमाणे २१ हजार ६०० विद्यार्थ्यांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू होईल. तसेच परदेशी शिष्यवृत्ती योजनेत संख्या वाढवून आता ५० ऐवजी यावर्षी ७५ करण्यात आल्याचे सांगितले.

बाह्य यंत्रणेमार्फत कर्मचारी घेणार

ओबीसी विद्यार्थ्यांसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणे ७२ वसतिगृहे सुरू करण्यात येणार आहेत. या वसतिगृहात अधीक्षक यांच्यासह अन्य कर्मचारी कसे नियुक्त केले जातील, असा प्रश्न आमदार सुधाकर अडबाले यांनी उपस्थित केला होता. त्यावर मंत्री अतुल सावे यांनी, वसतिगृहावर बाह्य यंत्रणेमार्फत लवकरच कर्मचारी नियुक्त केले जाणार असल्याचे सांगितले.

नागझिरात सोडलेली टी-१ वाघीण मध्यप्रदेशातील किरणापूर जंगलात !

गोंदिया :- जिल्ह्यातील नागझिरा- नवेगाव या व्याघ्र प्रकल्पात वाघांच्या संख्येत वाढ व्हावी या उद्देशाने चंद्रपूर जिल्ह्यातून येथे सोडण्यात आलेली टी १ वाघिणी ने नागझिरात सोडल्यानंतर आपले अधिवास क्षेत्राची निवड करताना भटकंती करत मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्हातील किरणापुरच्या जंगलात गेल्या एक महिन्यापासून आपले बस्तान बसविले आहे.



किरणापूर वन परिक्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून या वाघिणीचे स्थान मिळाल्यानंतर २० जुलै रोजी दुपारी किरणापूर येथील पवार भवन जवळील टीव्हीएस एजन्सीच्या मागे असलेल्या शेतात शेतकऱ्यांना या वाघिणीचे पायाचे ठसे उमटलेले दिसले. त्यावर शेतमालक सेवकराम पटले यांनी वनपरिक्षेत्र कार्यालयात जाऊन या बाबतची माहिती दिली.

गोंदिया तालुक्यातील पांगळी जंगलातून छिपिया पासून काही अंतरावर असलेल्या मध्य प्रदेशातील कडकाना जंगलात वाघिणीचे दर्शन झाले. तेव्हापासून ही वाघिणी मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्हातच फिरत आहे. वन विभागाची १५ ते २० सदस्यांचे ४ पथक या वाघिणीच्या मागावर असून तिचा शोध घेत आहेत. गेल्या १५ दिवसांपासून महाराष्ट्र राज्य वनपरिक्षेत्राचे पथक कॉलर आयडीद्वारे वाघिणीचा शोध घेण्यासाठी वेगवेगळे गट तयार करुन ठिकाण शोधत आहेत.

जोडीदारापासून विभक्त झाल्यानंतर आलेल्या या वाघिणीचे वय सुमारे ५ वर्षे असल्याचे सांगण्यात येत आहे. किरणापूर वनपरिक्षेत्रातील सीतापार गावात वाघिणीने एका गुराची शिकार केली.

किरणापूर वनपरिक्षेत्र अधिकारी जगतदास खरे यांनी सांगितले की, तिला पकडले जाऊ शकते, परंतु अद्याप ती हिंसक झालेली नाही. तिला या जंगलात खायला शिकार मिळत आहे, एकदा खायला मिळालं की ती आठ-दहा दिवस न खाता ही राहू शकते.

महाराष्ट्र राज्याच्या वनपरिक्षेत्रातील पथके लोकेशनद्वारे सातत्याने निरीक्षण करत आहेत. सुदैवाने किरणापूर वनपरिक्षेत्रात या वाघिणीने अद्याप पर्यंत कोणताही उपद्रव किंवा तांडव न करता ती जवळील हट्टा वनपरिक्षेत्रात सध्या आहे. यावर वनविभागाकडून सखोल व सतत लक्ष ठेवण्यात येत आहे.

हर बुथ पर यूथ या संकल्पनेतून पक्षाचा विस्तार-राजेंद्र जैन

सडक-अर्जुनी: युवा ही प्रत्येकच पक्ष व संघटनेची खरी ताकद असते. खासदार प्रफुल्ल पटेल यांनी राजकारण, समाजकारण, शिक्षण व रोजगार प्रत्येक स्तरावर युवा वर्गासाठी सदैव कटिबद्ध राहून कार्य केले असून पुढेही सुरुच राहील. यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या हर बुथ पर युथ या संकल्पनेतून पक्षाचा विस्तार करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

सडक-अर्जुनी तालुक्यातील ग्राम कोहमारा येथील एरिया-५१ जनसंपर्क कार्यालय व अर्जुनी-मोरगाव येथील राष्ट्रवादी युवक पदाधिकारी व कार्यकर्ता बैठकीत ते बोलत होते. सभेला आमदार मनोहर चंद्रिकापुरे, जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, जिल्हा उपाध्यक्ष यशवंत गणवीर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष केतन तुरकर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी चंद्रीकापुरे यांनी युवावर्ग उत्साह व उर्जेने कार्य करतील तर परिवर्तन आणण्याची पक्ष क्षमता ठेवतो.यामुळेच पक्षविस्तारासाठी युवांना जवाबदारी देणे पक्षाचे कर्तव्य असल्याचे सांगितले. परशुरामकर यांनी पक्षाच्या विस्तारासाठी हर बुथ पर युथ ची संकल्पना घेऊनच खासदार प्रफुल्ल पटेल यांचे हात मजबूत करणे हा पक्षाचा उद्देश असल्याचे सांगितले.

बैठकीला यशवंत गणवीर, किशोर तरोणे, डॉ. अविनाश काशीवार, लोकपाल गहाणे, डॉ.रूकिराम वाढई, शिवाजी गहाने, डॉ. अजय लांजेवार, रजनी गिऱ्हेपुंजे, लता गहाने, मंजू डोंगरवार, राकेश जायस्वाल, नामदेव डोंगरवार, नारायण भेंडारकर, सुशीला हलमारे, पुष्पलता दुरुगकर, आम्रपाली डोंगरवार, कविता ठवरे, अनीषा पठाण, माधुरी पिंपलकर, सुनीता जायस्वाल, मनीषा लाडे, रेखा पालीवाल, शालू बनपुरकर, जया भजे, उद्धव मेहेंदळे, प्रमोद डोंगरे, निप्पल बरय्या, नीलकंठ फुले, भोजराम रहेले, रवी बनपुरकर, राजेंद्र जांभुळकर, धनराज खंडाईत, अजय सहारे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हत्तींचा हैदोस, शेतकऱ्यांसह नागरिकांत भिती

देवरी: मागील ९ ते १० महिन्यांपासून जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील २५ हत्तींचा कळप संचार करीत आहे. दरम्यान हत्तींचा कळप पिकांची नासधूस करीत आहे. एवढेच नव्हे तर एका शेतकऱ्याचा बळीही घेतला. त्यातच कालपासून हत्तींचा कळपाने देवरी तालुक्याकडे मोर्चा वळविला आहे. उल्लेखनीय असे की, देवरी लगतच्या केशोरी तलाव परिसरात काल रात्री हत्तीचा कळप पहावयास मिळाला आहे. यामुळे देवरी तालुक्यातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच हत्ती शेतपिकांची नासधूस करीत समोर वाढत आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून गोंदिया जिल्ह्यात हत्ती कळपास मुक्काम आहे. दरम्यान हत्ती कळप जंगलासह शेतशिवारात संचार करीत हैदोस घालत आहेत. पिकांचे अतोनात नुकसान करीत आहेत. त्यातच काल अर्जुनी मोरगाव तालुक्यातून जंगल मार्गाने हत्तीचा कळप देवरी तालुक्यात दाखल झाला आहे. जेठभावडासह इतर गावात हत्तीच्या हैदोसामुळे पिकांचे अतोनात नुकसान होत आहे.

हत्तीचा कळप देवरी तालुक्यात आल्याने शेतकऱ्यांनाही शेतकामासाठी जाणे-येणे धोक्याचे ठरत आहे. (दि.२२) देवरी नगराला लागून असलेल्या केशोरी तलावाजवळ हत्तीचा कळप पहावयास मिळाला. यामुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये चांगलेच भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने हत्तीच्या कळपाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी तालुकावासीयांकडून केली जात आहे. तसेच हत्तींच्या हैदोसामुळे झालेल्या पिक नुकसानीचा मोबदलाही शेतकऱ्यांना द्यावा, अशीही मागणी जोर धरु लागली आहे.

हेल्मेट सक्ती नियमांचे काटेकोर अंमलबजावणी सुरू

सालेकसा: महाराष्ट्र शासनाने हेल्मेट वापरणे सक्तीचे केले आहे. यासाठी विविध ठिकाणी जनजागृती करिता मोहीम सुद्धा राबवण्यात आली आहे. शाळा महाविद्यालयातर्फे प्रभात फेरी काढून हेल्मेट वापरण्याबाबतची संदेश सुद्धा नागरिकांना दिले आहेत. तरीही नागरिकांकडून हेल्मेट वापरणे टाळले जात असल्याने आता पोलीस विभागातर्फे पेट्रोलिंग करून हेल्मेट न वापरणाऱ्यांवर कायदेशीर कारवाहीचे पवित्र घेतलेला आहे.

सालेकसा येथील मुख्य चौकात वाहतूक विभाग गोंदिया तसेच सालेकसा पोलीस स्टेशनच्या संयुक्त विद्यमाने पोलीस पेट्रोलिंग करून हेल्मेट सक्तीच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली. हेल्मेट न वापरणाऱ्यांकडून आर्थिक दंड वसूल करण्यात आले.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक गणेश शिंदे, वाहतूक शाखेचे चांगदेव उईके, दिनेश गौतम, राधेश्याम रहांगडाले, राकेश लुचे, विजेंद्र चुलपार, मपोशी कल्पना रहांगडाले व इतर पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

गोंदियात मणिपूर घटनेचा तीव्र निषेध

फुले आंबेडकरी महिला संघटनांचे राष्ट्रपतींना निवेदन

गोंदिया :- मणिपूर येथील महिलांच्या अवमान प्रकरणी तीव्र निषेध व्यक्त करून दोषींवर कडक कार्यवाही करण्याच्या मागणीला घेऊन सवित्रीमाई महिला फालोवर्स संघटनेच्या महिला कार्यकर्त्यांनी राष्ट्रपतींच्या नावे (ता.२४) निवेदन दिले.

जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांना हे निवेदन सादर करुन निवेदनात म्हटलं आहे की, मणिपूर येथे जातीय हिंसाचार घडवून दोन निष्पाप महिलांची नग्न धिंड काढून त्यांचावर अतिप्रसंग करण्यात आल्याची घटना ही सम्राट अशोकांच्या भारतात अशोभनीय आहे. ह्या अमानुष घटनेचे आमचं संघटन तीव्र निषेध व्यक्त करतं!

भारतीय राज्यघटनेच्या ४२ व्या घटना दुरुस्तीनुसार महिलांचा सन्मान करणे हे लोकांचे कर्तव्य असून मणिपूरची ही घटना असैविंधानिक आणि संविधान विरोधी आहे. कारगिलच्या युद्धात देशाचे संरक्षण करणाऱ्या वीर जवानांच्या वीर पत्नीचा असा अपमान करणे हे जातीयवादी आणि संकीर्ण मानसिकतेच्या नराधमांनी केलेले घोर कृत्य आहे. तेव्हा या नराधमांवर कडक कार्यवाही करुन त्यांना फाशीची शिक्षा ठोंठाविण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दरम्यान आपल्या भावना कळल्या असून आपले निवेदन हे राष्ट्रपतींना सादर करण्यात येईल अशी माहिती जिल्हाधिकारी श्री गोतमारे यांनी शिस्तमंडळाला दिली. शिष्टमंडळात सवित्रीमाई फुले महिला फालोवर्स ग्रुपच्या महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

मॉडेल कॉन्व्हेंटमध्ये पालक सभा

गोरेगाव: स्थानिक मॉडेल कॉन्व्हेंट अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक सत्र २०२३-२४ ची पहिली पालक सभा शनिवार २२ जुलै रोजी उत्साहात पार पडली. अध्यक्षस्थानी संस्था सचिव प्रा.आर.डी.कटरे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून बीआरसी साधन व्यक्ती सुनील ठाकुर, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष लोकेश कटरे, शाळा प्रशासकीय अधिकारी सी.बी.पटले, प्राचार्य सी.पी.मेश्राम उपस्थित होते. सभेची सुरुवात अध्यक्ष प्रमुख मार्गदर्शक व प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करुन केली.

यावेळी प्राचार्य मेश्राम यांनी प्रास्ताविकेत पालक व शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अभ्यासात गोडी निर्माण करण्याबाबत मार्गदर्शन केले. शाळेचे प्रशासकीय अधिकारी पटले यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता तसेच सर्वांगिण विकास यावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर शाळेत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सुविधांची माहिती पालकांना पुरविली. त्याचप्रमाणे सभेला पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष यांनी स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी कसे टिकून राहावे त्यासाठी विद्यार्थ्यांना चालू घडामोडी नियमित पुरवावी अशा सुचना दिल्या.

ग्रामपंचायत कार्यालय करांडली, पंचायत समिती अर्जुनी मोर.,जि.प.गोंदिया

जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ)

दिनांक :२६/०७/२०२३

ग्रामपंचायत कार्यालय करांडली,पंचायत समिती अर्जुनी/मोर,जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत नियोजन वर्ष २०२२-२३ या वर्षाकरीता खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून व्दिलिफापा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत	नमुना-७ निविदा फार्म किंमत	निविदासोबत भरावयाची अनामत रक्कम १%	निविदास्विकृत झाल्यास सुरक्षा ठेव २%	बिलातून कपात कपात करण्यात येणारी ठेव २%	काम पूर्ण करण्याचा कालावधी	कंत्राटदाराचे वर्ग
१	आंगणवाडीला शौचालय बांधकाम करणे(मौजा करांडली)	१५०००० /-	५०० /-	१५०० /-	३००० /-	३००० /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
२	जि.प.शाळा शौचालय बांधकाम करणे मौजा कराडंली	२००००० /-	५०० /-	२००० /-	४००० /-	४००० /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
३	जि.प.शाळा शौचालय बांधकाम करणे मौजा नविन चिचोली	२००००० /-	५०० /-	२००० /-	४००० /-	४००० /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
४	बंदिस्त गटारे बांधकाम करणे, मौजा कराडंली	३००००० /-	५०० /-	३००० /-	६००० /-	६००० /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
५	सौर दुहेरी पंप व जलशुध्दीकरण यंत्र(आरओ)बसविणे.	६००००० /-	५०० /-	६००० /-	१२००० /-	१२००० /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत

सदर कामे करण्याकरीता दोन लिफापा पद्दतीने अनुसुची ब-०१प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक २६/०७/२०२३ ते ०२/०८/२०२३ पर्यंत विक्रीकरीता उपलब्ध आहेत.नमुदकेल्याप्रमाणे अटि व शर्तीच्या अधिन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी.इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रक अटी व शर्तीप्रमाणे निर्धारित वेळेत ग्रामपंचायत कार्यालय करांडली येथे दिनांक २६/०७/२०२३ ते ०२/०८/२०२३ ला ठिक सायं.५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावित.निविदा दि.०२/०८/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता(शक्य झाल्यास)निविदा धारकांच्या समक्ष उघडण्यात येईल.निविदा मंजूर,नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे राखून ठेवला आहे.काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.

निविदेचा वेळापत्रक

१	निविदा प्रसिध्दी	दिनांकः-२६/०७/२०२३
२	निविदा ऑफलाईन भरणा दिनांक	दिनांकः-२६/०७/२०२३ ते ०२/०८/२०२३
३	निविदा प्रपत्र व फि/बयाणा रक्कम निविदा कागदपत्रे कार्यालयात जमा करण्याचा अंतिम दिनांक व वेळ	दिनांकः-२६/०७/२०२३ ते ०२/०८/२०२३ ला सायकांळी ५.०० वाजतापर्यंत
४	ऑफलाईन निविदा उघडणे(शक्य झाल्यास)	सरपंच/ग्रामविकास अधिकारी ग्रा.प.कराडंली यांचे कक्षात संबधित निविदाधारकांचे समक्ष दि.०२/०८/२०२३ दुपारी १२.००वाजता
५	निविदा शुल्क व अमानतर रक्कम भरणा करणे	ग्रा.प.कार्या.करांडली खाते क्रमांक ४२६७०२०१०००९६६४ बँकेचे नाव युनीयन बँक ऑफ इंडिया गोठणगाव.ifsc code-UBIN0542679 या खातेवर RTGS/NEFT/Direct Transfer किंवा ग्रा.पं.कराडंली येथे रोखीने भरणा करावे.

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत करांडली

सरपंच,
ग्रामपंचायत कराडंली

ग्रामपंचायत कार्यालय धाबेटेकडी/आदर्श, पंचायत समिती अर्जुनी मोर.,जि.प.गोंदिया

जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ)

ग्रा.पं.जा.क्र.४३/२०२३ दिनांक :२५/०७/२०२३

ह्या सुचनेद्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, मासिक सभा ठराव क्र.९/१ दिनांक १०/०७/२०२३ अन्वये ग्रामपंचायत धाबेटेकडी/आ येथे १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत प्रस्तावित धाबेटेकडी/आ येथे खालील कामे करण्याकरीता मोहरबंद व्द लिफाफा पद्धतीने अनुसुची ब-१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक २६/०७/२०२३ ते दिनांक ०२/०८/२०२३ पर्यंत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमुद केल्या प्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्ताऐवज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीसच्या दिनांकापासून ग्रा.पं.कार्यालयात दिनांक-०२/०८/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत कार्यालयतीन वेळेत सादर करावीत. काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे. सदर निविदा ही मासिक सभा दिनांक ०३/०८/२०२३ ला (शक्य झाल्यास) सर्व संबंधितासमोर उघडण्यात येईल.सर्व माहिती व अटी शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत	नमुना-७ निविदा फार्म किंमत	निविदासोबत भरावयाची अनामत रक्कम १%	निविदास्विकृत झाल्यास सुरक्षा ठेव २%	काम पूर्ण करण्याचा कालावधी	कंत्राटदाराचे वर्ग
१	पेव्हींग ब्लॉक व सौंदर्यीकरण करणे जि.प.शाळा धाबेटेकडी/आ	३००००० /-	५०० /-	३००० /-	६००० /-	३ महिने	योग्त त्या वर्गवारीत
२	सिमेंट क्रॉंक्रीट बंदीस्त नाली बांधकाम करणे	३००००० /-	५०० /-	३००० /-	६००० /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
३	ग्रामपंचायत बिल्डींग रंगरगोंटी करणे	१००००० /-	५०० /-	१००० /-	२००० /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत

श्री.पी.वाय.नगराळे
ग्रामसेवक, ग्रा.पं.धाबेटेकडी/आ

श्रीमती संध्या आरसोडे
सरपंच, ग्रा.पं.धाबेटेकडी/आ

ग्रामपंचायत कार्यालय नवनीतपुर पंचायत समिती अर्जुनी/मोर.

जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ)

ग्रा.पं.नवनीतपुर जा.क्र.५६/२०२३ दिनांक :२०/०७/२०२३

ह्या सुचनेद्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, मासिक सभा ठराव क्र.९ दिनांक १३/०७/२०२३ अन्वये ग्रामपंचायत नवनीतपुर येथे १५ वा वित्त आयोग निधी (जि.प.स्तर) व (ग्रा.पं.स्तर) तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ योजने अंतर्गत ची कामे करण्याकरीता मोहरबंद दोन लिफाफा पद्धतीने अनुसुची ब-२ प्रमाणे (टक्केवारी दराने) ऑफलाईन निविदा नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक २६/०७/२०२३ ते दिनांक ४/०८/२०२३ (सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमुद केल्या प्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्ताऐवज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीसच्या दिनांकापासून ग्रा.पं.कार्यालयात दिनांक-४/०८/२०२३ ला सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत. ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असून निविदा बाबद इतर सविस्तर माहिती व काहीही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे. सदर निविदा ही मासिक सभा दिनांक १०/०८/२०२३ ला (शक्य झाल्यास) सर्व संबंधितासमोर उघडण्यात येईल.

निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत	नमुना-७ निविदा फार्मची किंमत	निविदा सोबत भरावयाची अनामत रक्कम १%	काम पूर्ण करण्याचा कालावधी	कंत्राटदाराचे वर्ग
१	१५ वा वित्त आयोग निधी (जि.प.स्तर) अंतर्गत मौजा नवनीतपुर क्र.१ येथील जि.प.व प्रा.शाळेकरीता शौचालय बांधकाम व पाणी पुरवठ्याचे काम	६००००० /-	१००० /-	६००० /-	३ महिने	योग्त त्या वर्गवारीत
२	१५ वा वित्त आयोग (ग्रामपंचायत) अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प बांधकाम व देखभाल दुरुस्ती बाबत	२३३५३४ /-	१००० /-	२३३५ /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
३	स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा -२ योजने अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प बांधकाम व देखरेख दुरुस्तीबाबत	५३९३४८ /-	१००० /-	५३९३ /-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत

श्री.पी.एम.पवार
ग्रामसेवक, ग्रा.पं.नवनीतपुर

श्री.एम.आर.साखरे
सरपंच, ग्रा.पं.नवनीतपुर

शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सरसकट नक्षलभत्ता द्या

गोंदिया: आंतरजिल्हा व जिल्हा अंतर्गत बदलीचा नवीन अध्यादेश रद्द करुन जुन्या धोरणाप्रमाणे बदली प्रक्रिया सुरु ठेवावी. नक्षलग्रस्त भत्ता व अतिरिक्त घरभाडे थकबाकी जिल्ह्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कसलाही भेदभाव न करता सरसकट देण्यात यावा. सेवानिवृत्त अप्रशिक्षीत शिक्षक कर्मचाऱ्यांची संगणक वसुली बंद करण्यात यावी, उच्च न्यायालयाच्या नोव्हेंबर २०२० च्या आदेशान्वये आदर्श शिक्षकांना देण्यात येणाऱ्या वेतन वाढीचे प्रकरण निकाली काढण्यात यावे, अशी मागणी जनता शिक्षक महासंघ व भाजप शिक्षक आघाडीने केली.

जनता शिक्षक महासंघ व भाजप शिक्षक आघाडी यांची शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर सहविचार सभा नुकतीच राज्य संयोजिका डॉ. कल्पनाताई पांडे, डॉ. उल्हास फडके, राज्य सचिव अनिल शिवणर यांच्या मार्गदर्शनामध्ये जि.प. येथे खासदार सुनील मेंढे यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, शिक्षणाधिकारी कादर शेख, महेंद्र गजभिये यांच्या उपस्थितीत पार पडली.

सभेमध्ये २०१६ पासून बंद असलेली पदोन्नतीची प्रक्रिया व त्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान ही बाब खा.मेंढे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या लक्षात आणून देऊन येणाऱ्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक यांच्या पदोन्नत्या लवकर करण्यात याव्यात. अर्जीत रजा रोखीकरण, सातव्या वेतन आयोगाच्या तिसऱ्या व चौथ्या हप्त्याची थकबाकी जमा करणे, ३० जूनला निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना शासन आदेशान्वये लगतची वेतन वाढ देणे, आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी भाजप शिक्षक आघाडी राज्य सदस्य अरुण पारधी, जनता शिक्षक महासंघ जिल्हाध्यक्ष लक्ष्मण आंधळे, उपाध्यक्ष मधुकर बुरडे, गोपीनाथ ठुले, विजयकुमार इरले, मार्गदर्शक सतीश मंत्री, लोकनाथ तितराम, दीपक कापसे, नंदू भोयर, चरणदास डहारे, शरद बोंद्रे, प्रकाश घुगे, सखाराम गेंदे, दिनेश कोहळे, दुधराम राऊत, हरिओप नालट, भेरसिंग बिसेन उपस्थित होते.

अतिरिक्त शिक्षक असताना केलेल्या पदभरतीची चौकशी करा

गोंदिया : राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत ९७७ शाळा आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ३२ शाळा कार्यरत आहेत. या शाळांत मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त शिक्षक असताना विभागातील सहाय्यक आयुक्त चंद्रपूर व प्रादेशिक उपायुक्त नागपूर यांच्या संगनमताने संस्थाचालकांनी अनेक पदभरतीची कार्यवाही केलेली आहे. याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी, अशी मागणी नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे अधिवेशनात केली.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या नागपूर विभागातील अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांच्या संचमान्यता सन २०१८-१९ पासून झालेल्या नाहीत. मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त शिक्षक समायोजनाने काम करत असून समायोजन न झालेले अनेक अतिरिक्त शिक्षक/कर्मचारी मूळ आस्थापनेतून वेतन घेत आहेत. त्यामुळे शासनाच्या तिजोरीवर फार मोठा आर्थिक भार पडत असतांना विभागातील सहाय्यक आयुक्त चंद्रपूर व प्रादेशिक उपायुक्त नागपूर यांच्या संगनमताने संस्थाचालकांनी सन २०२२-२३ मध्ये पदभरतीच्या मान्यता घेऊन पदे भरली. त्यामुळे अतिरिक्त शिक्षक समायोजनापासून वंचित राहिले असून यामध्ये संस्थाचालकांनी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून गैरव्यवहार केल्याचे लक्षात येते. तरी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी व या विभागातील शाळांवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन एक तारखेला करण्याचा शासन आदेश असताना सुद्धा वेतन वेळेवर होत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागतो. शासनाकडून निधी आल्यानंतर सुद्धा अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे वेतन वेळेवर होत नाही. वेतन अनियमित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सुद्धा कार्यवाही करावी, अशी मागणी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवर बोलताना आमदार सुधाकर अडबाले यांनी केली.

चंद्रपूरमध्ये अतिरिक्त शिक्षक असताना पदभरती झाली असल्यास त्याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करून नियमित वेतनासाठी मंत्रालयातून निधी वेळेत पाठवितो. मात्र, जिल्हास्तरावर पेपर वर्क वेळेवर होत नसेल तर त्या अधिकाऱ्यांवर देखील कार्यवाही करू, असे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे उत्तर देताना म्हणाले.

राष्ट्रवादीच्या मनोमिलनाचा भाजपला लाभ

काँग्रेस-भाजपामध्येच होणार लढत: निवडणुकीसाठी आतापासूनच फिल्डिंग

गोंदिया: राष्ट्रवादी काँग्रेस-भाजपा-शिंदे गटासोबत सत्तेत सहभागी झाले. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत युती झाल्यास तिरोडा विधानसभा मतदार संघात भाजपाचे विद्यमान आमदार विजय रहांगडाले हे उमेदवारीसाठी आग्रह धरतील. पक्षदेखील त्यांना झुकते माप देईल, असे झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे रविकांत बोपचे यांचा चार वर्षाच्या मेहनतीवर पाणी पेरले जाईल. तर काँग्रेसचे दिलीप बन्सोड यांच्याकरिता तिकीट मिळणे सोपे जाणार आहे. निवडणुकीपर्यंत राष्ट्रवादीची भूमिका काय राहते, यावर सर्व समीकरण ठरणार आहे.

तिरोडा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची चांगली पकड आहे. तसेच भाजपदेखील गेल्या दोन विधानसभा निवडणुकांत विजयी होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट राज्याच्या सत्तेचा वाटेकरी झाला. त्यातच वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल हे देखील त्या गटात आहेत.

पटेल यांच्या गटाचा तिरोडा मतदारसंघात वरचष्मा आहे. मात्र सद्य:स्थितीत भाजपचे विजय रहांगडाले येथील विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे ते जुन्या तिकीटाकरिता दावा करतील. गेल्या चार वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे रविकांत (गुड्डू) बोपचे जनसंपर्क करत आहेत. परंतु आता राष्ट्रवादी भाजपसोबत गेल्याने दोन्ही पक्षाची युती झाल्यास भाजपच्याच वाट्याला हा मतदारसंघ जाणार असून बोपचे यांचा भ्रमनिराश होणार आहे. तसेच दुसरीकडे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आणि माजी आमदार दिलीप बन्सोड यांच्याकरिता रान मोकळे राहणार आहे. असे समीकरण राहिल्यास या मतदारसंघात भाजप आणि काँग्रसमध्येच लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ही आहेत विद्यमान आमदारांची जमेची बाजू

विद्यमान आमदार विजय रहांगडाले हे ९ वर्षापासून तिरोडा-गोरेगाव मतदार संघात प्रतिनिधीत्व करीत आहे. त्यांनी या चार वर्षाच्या काळात प्रामुख्याने धापेवाडा उपसा सिंचन पूर्णत्वासाठी विशेष प्रयत्न केले. टप्पा दोनच्या कामांसाठी शासनाकडून ३०० कोटींचा निधी खेचून आणला. त्याचप्रकारे तिसऱ्या टप्प्यासाठी प्रयत्न सुरु आहे. मंजुरीची पक्रियाही पूर्ण झाली आहे. १९७८ पासून विविध अडथळ्यांमुळे अडकलेल्या निमगाव प्रकल्पाला देखील अथक प्रयत्नांमुळे सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली.

या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होणार आहे. तिरोडा शहरात रस्ता आणि पुलाकरिता १२ कोटींचा निधी मिळाला. गोरेगाव आणि तिरोडा तालुक्यातील शेतीला सिंचन व्हावे याकरिता धापेवाडा उपसा सिंचन योजनेच्या टप्पा दोनमधून फेज ३ अंतर्गत कालव्याद्वारे गोरेगाव येथे पाणी आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. हे काम पूर्ण झाल्यास ४००० हेक्टर शेती सिंचनाखाली येणार आहे.

४७ गावांमध्ये कारभाऱ्यालाच बसायला जागा नाही

गोंदिया: जिल्ह्यातील ५४७ पैकी ७ ग्रामपंचायतींना अद्यापही स्वत:ची इमारत नाही. तर ४० ग्रामपंचायतींच्या इमारती मरणास्तव अवस्थेत असल्याने गोंदिया जिल्ह्यातील तब्बल ४७ ग्रामपंचायतीमध्ये कारभारल्याच बसायला जागा नाही. त्यामुळे गाव विकासाचा कारभार करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावचे हे चित्र पाहिल्यावर कसला विकास, असे म्हणण्याची वेळ गावकारभाऱ्यांवर आली आहे.



पंचायतराज व्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ग्रामीण भागातील गावपातळीवर विकासाच्या दृष्टीने काम करणारी महत्वाची संस्था म्हणून ग्रामपंचायतींना विशेष महत्व आहे. गावाचा विकास आणि ग्रामस्थांना मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम ग्रामपंचायतीमार्फत केले जाते. परंतु जिल्ह्यातील आठ तालुक्यातील एकूण ग्रामपंचायतीपैकी ४७ ग्रामपंचायतीमध्ये कारभाऱ्याला बसायला जागा नसल्याचे चित्र आहे. ग्रामपंचायतींच्या बैठका, ग्रामसभा, ग्रामपंचायतीकडे स्वत:ची उपलब्ध खोलीत ग्रामपंचायतींचे कामकाज येतात. त्यामुळे गावात ग्रामपंचायत घेण्यासह कामकाज करण्यासाठी नाही. गावातील जिल्हा परिषद शाळा करण्यात येत आहे. त्यामुळे इमारत कार्यालय उभारणीची अत्यंत गरज आहे. गावकारभाऱ्यांना बसायला समाज मंदिर किंवा जुन्या चावडीवर बसावे लागत आहे.

४७ सरपंचांचा बसण्याची इमारत नाही

जिल्ह्यातील आठ तालुक्यात ४७ ग्रामपंचायतीकडे बसण्यासाठी इमारत नाही. स्वत:ची इमारत नसलेल्या ७ तर जीर्ण इमारती असलेल्या ४७ अशा जिल्ह्यातील ४७ गावातील सरपंचांना ग्रामपंचायतीकरिता इमारत हवी. या ४७ ग्रामपंचायतीचे कामकाज गावातील समाजमंदिर, जुन्या अकोट इमारती व शाळांच्या खोलीत सुरु असल्याचे चित्र आहे.

कुठे मंदिरात तर कोठे शाळेत होतात बैठका

ग्रामपंचायतची इमारत चाळीस वर्षापुर्वी बांधलेली आहे. ती सध्या जीर्ण अवस्थेत आहे. इमारतीला पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गळती आहे. त्याच इमारतीमधून कामकाज होत आहे. मात्र ही इमारत कधी कोसळेल सांगता येत नाही. नवीन इमारत मंजुरीसाठी शासनाकडे प्रस्ताव दिला आहे.

कार्तिक हेमने, सरपंच नवरगावकला

ग्रामपंचायतीकडे स्वत:ची इमारत नसल्याने गावातील जुन्या कार्यालयात ग्रामपंचायतीच्या मासिक बैठका घेण्यात येतात. तसेच ग्रामपंचायतींचे कामकाज देखील जुन्या इमारतीत करण्यात येत आहे. त्यामुळे गावात ग्रामपंचायत इमारत कार्यालय उभारणीची अत्यंत आवश्यकता आहे. प्रशासनाने तातडीने मंजुरी देण्याची गरज आहे.

संगीता मेंढे, सरपंच शंभूटोला

वाघांशी शिकार करणाऱ्या टोळीचा वनविभागाकडून पर्दाफाश

गडचिरोली : अतिसंरक्षित प्राणी म्हणून गणल्या जाणाऱ्या वाघांची शिकार करणाऱ्या हरियाणामधील टोळीची विदर्भातील वाघांवर वक्रदृष्टी पडली आहे. वनविभागाला त्याचा सुगावा लागल्याने या टोळीतील सदस्यांना गडचिरोली जिल्ह्यातून ताब्यात घेऊन त्यांच्याकडून वाघाच्या शिकारीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले आहे. त्यांनी काही वाघांची शिकार केली असण्याची शक्यता असली तरी अनेक वाघांची शिकार करण्याचा डाव उधळल्या गेला.

एकीकडे चंद्रपूरसोबत गडचिरोली, गोंदिया, भंडारा जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात वाघ आणि त्यांच्याकडून होणाऱ्या मानवी हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. याचाच गैरफायदा शिकाऱ्यांच्या टोळीने घेत विदर्भात डेरा टाकला. दरम्यान गेल्या २८ जून २०२३ रोजी आसाम राज्यातील गुवाहाटी येथे पोलीस विभाग व वनविभागाच्या संयुक्त कारवाईत वाघाच्या शिकार प्रकरणी हरियाणा राज्यातील बावरीया जमातीच्या तीन व्यक्तींना वाघाची कातडी व हाडांसह अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून प्राप्त प्राथमिक माहितीच्या आधारे वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो, नवी दिल्ली यांनी देशातील सर्व प्रमुख व्याघ्र प्रकल्पांच्या सभोवतालच्या क्षेत्रांकरीता वाघांच्या शिकारीची शक्यता असल्याची सूचना २९ जून रोजी दिली होती. त्यानुसार सदर शिकाऱ्यांनी चंद्रपूर व गडचिरोली या परिसरात शिकार केली का, याची पडताळणी करण्याकरीता आणि त्याबाबत अधिक गुप्त माहिती मिळवण्यासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक जितेंद्र रामगावकर यांनी तीन सदस्यीय पथक गुवाहाटी येथे पाठविले होते. सदर पथकाने गुवाहाटी येथे कारागृहात असलेल्या आरोपींची चौकशी केली असता सदर शिकारी टोळीमधील काही महत्त्वाचे सदस्य गडचिरोली वनविभागाच्या क्षेत्रात वावरत असल्याची माहिती समोर आली.

गुप्त माहितीच्या आधारे सदर सर्व संशयितांवर पोलीस विभागाच्या मदतीने गुप्त पाळत ठेवण्यात आली. त्यांना जेरबंद करण्याकरीता मेळघाट व्याघ्र प्रकल्प, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर वनवृत्त आणि गडचिरोली वनवृत्ताची एक संयुक्त चमू गठीत करण्यात आली. सदर चमूने २३ जुलैच्या मध्यरात्री २ वाजता गडचिरोलीजवळच्या आंबेशिवणी येथे गडचिरोली पोलिसांच्या मदतीने छापा टाकला. त्यात आंबेशिवणी येथे झोपड्यांमध्ये राहात असलेल्या हरियाणामधील ६ पुरुष, ५ महिला आणि ५ लहान मुले अशा सर्वांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. यावेळी त्यांच्या झोपडीतून वाघांच्या शिकारीसाठी त्यांच्या पायांना जखडून ठेवण्यासाठी वापरले जाणारे ७ शिकंजे (ट्रॅप), धारदार शस्त्रे आणि ४६ हजार रुपये रोख जप्त करण्यात आले.

संशयितांकडून प्राप्त माहितीच्या आधारे करीमनगर (तेलंगाणा) व धुळे (महाराष्ट्र) येथून सुद्धा संशयित व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. हे सर्व संशयित हरियाणा व पंजाब या राज्यातील निवासी असल्याचे वनविभागाने कळविले.

ही सर्व कारवाई प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता यांच्या मार्गदर्शनात मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प ज्योती बॅनजी, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक डॉ.जितेंद्र राम गावकर, गडचिरोलीचे वनसंरक्षक रमेशकुमार, गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल, चंद्रपूरचे रविंद्रसिंह परदेशी, गडचिरोलीचे उपवनसंरक्षक मिलीश दत्त शर्मा, ताडोबाचे सहायक वनसंरक्षक बापू येळे, गडचिरोलीचे सहायक वनसंरक्षक सोनल मडक यांच्यासह इतर वन आणि पोलीस अधिकाऱ्यांनी केली.

विशेष कार्यदलाचे गठण

या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावण्यासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व गडचिरोली वनवृत्तातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेले विशेष कार्य दल गठीत करण्यात आले आहे. तसेच सहाय्यक वनसंरक्षक गडचिरोली यांना तपास अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. प्राथमिक चौकशीअंती वरील सर्व संशयितांवर वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील तरतुदीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे. या कारवाईमुळे गचिरोली, चंद्रपूर तसेच तेलंगाणा राज्यात वाघांची शिकार करण्याचा परप्रांतीय टोळीचा मोठा कट अयशस्वी करण्यात वन विभाग व पोलीस विभागाला यश मिळाले आहे.

१६ महिन्यांपासून १०२ चे चालक विनावेतन

गोंदिया: जिल्ह्यातील प्रत्येक आरोग्य संस्थेत रुग्णसेवेसाठी अत्यावश्यक सेवा म्हणून १०२ प्रणालीअंतर्गत रुग्णवाहिका दिल्या आहेत. त्या रुग्णवाहिका चालविण्यासाठी २००६-०७ पासून मानधन तत्वावर चालकांची नियुक्ती केली जाते. मात्र, त्या चालकांना एप्रिल २०२२ पासून आतापर्यंतचे मानधन मिळाले नाही. २४ बाय ७ धर्तीवर ते कार्यरत असून देखील मानधन मिळाले नसल्याने उसनवानी घेण्याची वेळ ओढवली आहे. त्यात कुटुंबाचीही वाताहत होत असल्याचे चालकांचे म्हणणे आहे.

तळागाळातील नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचावी यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले जात असून त्यासाठी कोट्यावधींचा खर्च देखील होत आहे. पुर्वी रुग्णांना रुग्णालयापर्यंत इतर साधनाने यावे लागत होते. मात्र कालांतराने शासनाने रुग्णाला रुग्णालयात आणणे त्यांच्यावर सुश्रुषा करुन पुन्हा घरापर्यंत पोहोचवून देण्याचेही साधन दिले आहे. जिल्ह्यात रोजंदारी पद्धतीने ६७ वाहन चालकांची नेमणूक केली होती. त्यानंतर तत्कालीन जिल्हा परिषदेचे आरोग्य समिती सभापती विनोद अग्रवाल यांनी रोजंदारी पद्धत बंद करुन त्यांना राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रुग्ण कल्याण समितीमार्फत नेमणूक केली. त्यावेळी त्यांना नियमित वेतन, दरवर्षी मानधनात वाढ केली जात होती. मात्र चालकांना माहिती न देता भोपाळ येथील एका कंपनीला चालक पुरविण्याचे कंत्राट देण्यात आले. त्या कंपनीने देखील जुन्याच चालकांना ११ महिन्यांच्या करार पद्धतीने कामावर ठेवले. एक वर्षानंतर त्या कंपनीने पुन्हा कंत्राट घेतले नाही. आता ते कंत्राट चंद्रपूर जिल्ह्यातील संत मिराबाई संस्थेला कंत्राट देणार होते. मात्र चालकांनी त्या संस्थेसोबत काम करण्यास नकार दिला. आता गेल्या १६ महिन्यांपासून अधिक काळ लोटला असताना ६७ चालक कसल्याही करारावीना आणि वेतनाविना काम करत आहेत.

दिवसातील २४ तास काम करताना असताना हे कर्मचारी लॉगबूक देखील भरत असून हजेरी देखील करत आहेत. गतवर्षी २७ दिवस चालकांनी मानधन आणि मानधवाढीसाठी आंदोलन केले होते. आमदार विनोद अग्रवाल यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे घेण्यात आले होते. त्या कर्मचाऱ्यांनी आपल्या हक्कांकरिता न्यायालयात देखील धाव घेतली. उल्लेखनीय म्हणजे या कर्मचाऱ्यांना केवळ ८ हजार रुपये मानधन दिले जात आहे. यउलट राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत इतर जिल्ह्यांत २१ हजारांपेक्षा अधिक मानधन मिळत असल्याचे चालकांचे म्हणणे आहे.

भोपाळ येथील कंपनीने सोडून गेल्यानंतर १५ दिवसांचे मानधन २१,७६० रुपये दराने दिले. त्यामुळे आपली आतापर्यंत लूट केल्याचा आरोप देखील कर्मचाऱ्यांनी केला. चालक जननी सुरक्षा, मानव विकास, अपघात, आरोग्य शिबिर, मंत्र्यांचा ताफा, अधिवेशन, रुग्णालय प्रशासनाची कामे करतात. महत्वाचा घटक असलेल्या चालकांना न्याय द्यावा, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

नियमाप्रमाणे मनधन देण्याची मागणी

गेल्या अनेक वर्षापासून आम्ही रोजंदारी तत्वावर काम करत आहोत. २४ तास रुग्ण आणि प्रशासनाला सेवा देत आहोत. मात्र आम्हाला न्याय मिळत नाही. १६ महिन्यांपासून मानधन नसल्यामुळे कुटुंबाची आर्थिक कुचंबना होत आहे. आम्हाला रोजंदारी ऐवजी कंत्राटी कर्मचारी संबोधून एनआरएचएमने ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणे मानधन देण्यात यावे.

शेखर चंद्रीकापुरे, चालक संघटना अध्यक्ष

लवकरच मिळणार न्याय

सध्या कार्यरत असलेले वाहनचालक बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यात आले होते. त्यांना मानधन देण्याची जबाबदारी त्या बाह्य यंत्रणेची आहे. चालक ६ महिन्यांपासून अधिक काळ विनावेतन काम करतात. ही बाब योग्य नाही. इतर कायम कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडून धडा घेतला पाहिजे. चालकांनी न्यायालयात मानधनासाठी धाव घेतली आहे. लवकरच निर्णय घेण्याची शक्यता आहे.

यशवंत गणवीर, आरोग्य समिती सभापती

गडचिरोलीच्या सीमेवर शिकारी सक्रिय, मोठ्या पट्टेदार वाघाची शिकार!

चंद्रपूर: चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावती भागातील जंगलात एका मोठ्या पट्टेदार वाघाची शिकार आसाममधील शिकारींकडून करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

आसाम पोलिसांनी हरियाणातून बावरिया जमातीच्या चार जणांना अटक केली आणि गुवाहाटीमध्ये वाघाची ९ फूट लांबीची कातडी आणि सुमारे १९ किलो हाडे जप्त केली आहेत. दरम्यान या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी वरिष्ठ वन्यजीव अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एक-दोन दिवसात तपासणी करणार आहे.चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात वाघांची वाढलेली संख्या बघता शिकारी सक्रिय झाले आहेत. २८ जून रोजी, आसाम पोलिसांनी हरियाणातून बावरिया जमातीच्या चार जणांना अटक केली आणि गुवाहाटीमध्ये वाघाची कातडी आणि हाडे जप्त केली. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात सहभागी असलेल्या आणखी एका व्यक्तीलाही अटक केली आहे.

पाणी भरलेल्या खड्ड्यातून प्रवास धोक्याचा

गोंदिया: शहरातील चारही बाजूचे रस्ते सध्या खड्डेमय झाले आहेत. या खड्डेमय रस्त्यांवरुन नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याने हीच का ती स्मार्ट सिटी असा प्रश्न आता शहरवासी विचारु लागले आहेत. या रस्त्यांवरुन गावखेड्ड्यातील नागरिक शहरात येत असतील तर सावधान व्हा असा इशारा संबंधित विभागाला दिला आहे.

लोकप्रतिनिधींनी गोंदिया शहराला स्मार्ट सिटी असे नाव दिले. मात्र, शहराची स्थिती बघता असे काहीच वाटत नाही. यापेक्षा तर गावखेड्ड्यातील रस्ते बरे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना असो वा मुख्यमंत्री सडक योजना या योजनेंतर्गत गावखेड्ड्यातील रस्ते तयार करण्यात येत आहेत. गाव तिथे रस्ते असे प्रशासनाचे घोषवाक्य आहे. गावातील रस्ते सद्य:स्थिती सुधारली आहे. मात्र, गोंदिया शहरातील रस्ते बघितले तर गाव नाही हे तर खेडेगाव अशी स्थिती आहे.

गोंदिया शहरातील बालाघाट टी पाईंट ते कुडवापर्यंत रस्ता पूर्णत: उखडला असून जागो-जागी खड्डे पडले आहेत. तर शहरातील रामनगर ते सूर्याटोला, गंज बाजर ते मुर्री चौकी, राजस्थान शाळा ते अंडरग्राऊंड, मुर्री ते ढाकणी, फुलचूर नाका ते सारस चौक आदी रस्त्यांची तर पूर्णत: वाट लागली आहे. शहरातील वॉर्डातील रस्त्यांचीसुद्धा बिकट अवस्था आहे. याबाबत नगर परिषद व संबंधित विभागाकडे तक्रार केली असता तेसुद्धा लक्ष देण्यास तयार नाहीत. त्यामुळे नागरिकांना या रस्त्यांवरुन जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यांवर अनेक अपघात घडले असून कुणाला आपले पाय तर कुणाल जीव गमवावा लागला आहे. आता कोणाकडे समस्या मांडावी असा प्रश्न सर्वसामान्यांना पडत आहे. परिणामी, नागरिकांना नरक यातना भोगत या रस्त्यांवरुन प्रवास करावा लागत आहे.

बांधकाम साहित्य रस्त्यावर

गोंदिया शहरातील प्रत्येक वॉर्डात घर, शौचालय आदी बांधकाम सुरु आहे. बांधकाम करणारे घरमालक आपले साहित्य रस्त्यावर ठेवत आहेत. या रस्त्यांवरील साहित्यांमुळे अनेक अपघात घडत आहेत. रस्त्यावर साहित्य ठेवण्यासाठी नगर परिषद प्रशासनाकडून परवानगी घ्यावी लागते. मात्र, घर मालक तसे करीत नसून विना परवानगीने रस्त्यावर साहित्य ठेवत आहे. त्यामुळे अनेक नागरिकांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. याकडे नगर परिषद प्रशसनाने लक्ष देऊन रस्त्यावर साहित्य ठेवल्यानंतर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

नपच्या बाजूलाच घाणीचे साम्राज्य

शहरातील परिसर स्वच्छ व सुंदर रहावे, याकरिता नगर परिषदेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांनी टाकलेला केरकचरा उचलून परिसर स्वच्छ करण्यात येतो. मात्र, नगर परिषदेच्या बाजूलाच पाणी टाकीच्या समोरच घाणीचे साम्राज्य पसरले आहे. मात्र, याकडे नगर परिषदेचे दुर्लक्ष आहे.

सालेकसा लपाविभागाच्या कार्यालयाचे छत कोसळले,अधिकारी-कर्मचारी बचावले

गोंदिया-गोंदिया जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागाचे उपविभाग असलेल्या सालेकसा येथील कार्यालयाचे छत कोसळल्याची घटना आज दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली.जिर्णवस्थेत असलेल्या या उपविभागीय कार्यालयाच्या दुरुस्तीकडे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने केलेल्या दुर्लक्षामुळे गेल्या अनेक वर्षापासून दुरुस्तीची मागणी करुनही कार्यालयाची दुरुस्ती करण्यात आली नाही.

परिणामी गेल्या काही दिवसात जिल्ह्यात झालेल्या जोरदारपावसामुळे आधीच जिर्ण असलेल्या या कार्यालयाचे वर्हांडाचे पीओपीसह छत कोसळले.प्लाय लावून डागडुजी करण्यात आलेले छत इमारतीला लागलेल्या लाकडी रॉप्टरसह कोसळले.यावेळी कर्मचारी हे आपल्या कार्यालयातील टेबलावरच असल्याने जिवितहानी झाली नाही.मात्र जिवमुठीत घेऊनच येथील अधिकारी कर्मचारी काम करीत असून कधी मोठी घटना होईल याचा अंदाज नाही.फारजुनी व मोडकळीस असलेली ही इमारत गेल्या ८-१० वर्षापासून जिर्णावस्थेत आहे.मात्र इमारतीच्या दुरुस्तीकडे पाहिजे तसे प्रशासनाने लक्ष दिलेले नाही.